रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ७२ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹



• पेझारी येथे शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत मानाच्या दहीहंडीचा थरार. (छायाचित्र :जीवन पाटील, भाकरवड)

# शेकाप पुरस्कृत दहीहंड्यांनी जिंकली प्रेक्षकांची मने

## ग्रामीण व शहरी भागात जल्लोष
## शेकाप पुरस्कृत दहीहंडीचा उत्सव ठरला रंगतदार
## दहीहंडी सोहळा उत्साहात



। प्रमोद जाधव । अलिबाग ।

मच गया शोर...., गोविंदा रे गोपाळा... या गाण्यांच्या सुरावर ठेका धरत रायगड जिल्ह्यात दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. शेकाप पुरस्कृत अलिबाग, पेझारी येथे मानाच्या व अभिमानाच्या दहीहंडी उत्सवाचा आनंद गोविंदा पथकांसह व प्रेक्षकांनी मनमुरादपणे लुटला. पावसात भिजत, अनेक गोविंदा पथकाने मानवी मनोरे उभारून सलामी दिली. पाऊस सुरु असतानादेखील दहीहंडीचा उत्साह कायमच दिसून आला. त्यामुळे अलिबागच्या दहीहंडीचा सोहळा अतिशय रंगतदार ठरला.

### स्पर्धा नसून एक उत्सवाचा सोहळा

शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटना अलिबाग व प्रशांत नाईक मित्र मंडळ आयोजित दहीहंडी उत्सवाची परंपरा सुमारे २१ वर्षापासून सुरु आहे. दहीहंडी उत्सवाचा मानबिंदू ठरणारे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबागमध्ये निटनेटके,उत्तम व्यवस्थापन व आयोजन केले जाते. ही स्पर्धा नसून उत्सवाची परंपरा जपण्याचे काम गेली अनेक वर्षापासून करण्यात आले आहे. गोविंदा पथकांना आर्थिक बळ देऊन पारंपरिक खेळाला एक व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. साहसी, एकता व समानतेचा संदेश या दहीहंडी सोहळ्याच्या माध्यमातून देण्यात आला.

### दहीहंडी पाहण्याचा आनंद घरबसल्या

अलिबागमधील शेतकरी भवन समोर शेकाप पुरोगामी युवक संघटना अलिबाग पुरस्कृत व प्रशांत नाईक मित्रमंडळ आयोजित दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे होणाऱ्या या सोहळ्यातील गर्दीमध्ये काहींना प्रत्यक्षात हा सोहळा पाहता येत नाही. त्यामुळे घरबसल्यादेखील दहीहंडी उत्सव बघण्याची व्यवस्था करण्यात आली होती.अलिबागसह वेगवेगळ्या भागातील लाखो नागरिकांनी प्रोलिंक स्पोर्ट्स या लिंकवर मानाच्या दहीहंडीचा कार्यक्रम पाहिला.

(छायाचित्र : समीर मालोदे)

# जिल्ह्यात गोविंदांचा थरार



जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. शनिवारीदेखील दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. तरीदेखील शहरी भागासह ग्रामीण भागातील नागरिकांनी दुपारी दोन वाजल्यापासून शेतकरी भवन समोर जमण्यास सुरुवात केली. पाऊस असतानादेखील गेल्या अनेक वर्षाची परंपरा पाहण्यासाठी अलिबागमध्ये काही तासातच अलोट गर्दी झाली. डिजेचा ठेका, सुमधूर अशी गाणी, विजेचा झगमगाट, शिस्तबध्द नियोजन, फुलांनी सजविलेली दहीहंडी, तरुणाईच्या सन्मानाचा तसेच गोविंदा पथकासह उपस्थितांच्या सुरक्षेचा विचार करून अलिबागमध्ये दहीहंडी उभारण्यात आली. उंचावर बांधण्यात आलेली दहीहंडी फुलांनी आणि विद्युत रोषणाईने आकर्षक अशी सजविली होती. त्यामुळे अनेकांनी ही दहीहंडी आपल्या मोबाईलच्या कॅमेरात कैद करण्याचा प्रयत्न केला. काहींनी व्हीडीओ तर काहीं दहीहंडी समवेत सेल्फीचाही आनंद लुटला.

कुलाबा ढोल ताशा व ध्वज पथकामार्फत ढोल ताशांच्या गजरातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवून या सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्या हस्ते नारळ वाढवून मानाच्या दहीहंडी सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, सार्वजनिक वाचनालयाच्या उपाध्यक्ष शैला पाटील, शेकाप ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, शेकाप जिल्हा महिला आघाडी उपाध्यक्षा वृषाली ठोसर, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, किशोर हजारे, सतिश प्रधान, अशोक प्रधान, नागेश कुलकर्णी, विक्रांत वार्डे, पंचायत समितीचे माजी सदस्य संजय पाटील, चेंढरे ग्रामपंचायतीचे माजी

•> पान ४ वर

(सविस्तर वृत्त उद्याच्या अंकात)

## पेझारीत शेकाप पुरस्कृत दहीहंडी सोहळ्याचा जल्लोष
# अलिबाग कोळीवाडा गोविंदा पथक ठरला विजेता

। अलिबाग । प्रतिनिधी ।

चित्रलेखा नृपाल पाटील पुरस्कृत शेकाप पुरोगामी युवक संघटना पेझारी व मृदूंग म्हात्रे मित्रमंडळ आयोजित पेझारी येथे दहीहंडीचा उत्सव शनिवारी (दि.१६) साजरा करण्यात आला.

•> पान ४ वर



# दहीहंडी बांधताना तरुणाचा मृत्यू

**मुंबई :** मुंबई-ठाण्यामध्ये उंच दहीहंडी फोडण्यासाठी थर रचण्यात गोविंदा पथके व्यग्र असतानाच उत्सवाला गालबोट लागले. मानखुर्द परिसरात बाल गोविंदांसाठी दहीहंडी बांधणाऱ्या एका गोविंदाचा पडून मृत्यू झाला. तर ठिकठिकाणी दहीहंडी फोडण्यासाठी रचलेल्या थरांवरून कोसळून ३० जण जखमी झाले.

मानखुर्दमधील महाराष्ट्र नगर परिसरात बाल गोविंदांसाठी दुपारी ३ च्या सुमारास दहीहंडी बांधत असताना जगमोहन शिवकिरण चौधरी (३२) याचा पहिल्या मजल्यावरून खाली पडून मृत्यू झाला. पहिल्या मजल्यावरून पडल्यानंतर जगमोहनला त्याच्या नेतावाईकांनी तातडीने गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी नेले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, मुंबईमध्ये विविध ठिकाणी दहीहंडी फोडताना थरावरून पडल्याने ३० जण जखमी झाले आहेत. यातील १५ जणांना उपचार करून घरी पाठवण्यात आले, तर विविध रुग्णालयांमध्ये १५ गोविंदांवर उपचार सुरू आहेत.मुंबई शहरामध्ये १८ जण जखमी झाले असून, त्यापैकी १२ जणांवर उपचार सुरू आहेत. ६ जणांना उपचार करून घरी पाठवण्यात आलेत. तसेच पूर्व उपनगरामध्ये सहा जण जखमी झाले आहेत त्यातील तिघांवर रुग्णालयामध्ये उपचार सुरू असून, तिघांना उपचार करून घरी

•> पान ४ वर

# विद्युत वाहिनीने महिलेचा मृत्यू

**। रसायनी । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चौक क्षेत्रातील जांभिवली या गावात चालू विद्युतवाहिनी तुटून एका वयोवृद्ध महिलेने आपला जीव गमावला.

जीर्ण झाल्याला विद्युतवाहिनी जोरदार वारा आणि पाऊस यामुळे तुटतात. याची वारंवार तक्रार या परिसरातील जागरूक नागरिक यांनी करूनदेखील वीजवितरण कंपनीने दुर्लक्ष केल्याने आज एक जीव गेल्याचे सुरेश गावडे यांनी सांगितले.

गावातील एक वृद्ध महिला सुलोचना गावडे या घराच्या मागील बाजूस असलेल्या प्रसाधनगृहाकडे जात असताना अचानक त्यांच्या अंगावर विद्युत प्रवाह सुरू असलेली विद्युत वाहिनी तुटून पडली त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. घरातील त्यांचा नातू व शेजाऱ्यांच्या लक्षात ही घटना

•> पान ४ वर

# विक्रोळीत कोसळली दरड

**मुंबई :** विक्रोळीमधील पार्कसाईट परिसरात शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास एका घरावर डोंगराचा काही भाग कोसळला. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील पिता आणि मुलीचा मृत्यू झाला. तर आई, मुलगा आणि शेजारी



राहणारे अन्य दोघेजण जखमी झाले असून सर्व जखमींवर घाटकोपराच्या राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुंबई शहर आणि उपनगरात शुक्रवारी रात्रीपासून जोरदार

•> पान ४ वर

## कोकण नगरसह जय जवानचे
# विश्वविक्रमी थर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

ठाण्याला जशी दहीहंडीची पंढरी म्हणून ओळखले जाते. तसेच मुंबईतील जोगेश्वरी येथील जय-जवान गोविंदा पथक आणि माझगाव येथील ताडवाडी गोविंदा पथकांना त्यांच्या शिस्तबद्ध मानवी मनोरे रचण्याच्या पद्धतीला ओळखले जात होते. जय जवान पथकाला गोविंदा पथकातील उपनगरचा राजा म्हटले जाते. परंतु, शनिवारी झालेल्या दहीहंडीमध्ये कोकण नगर गोविंदा पथकाने तब्बल १० थर रचून विश्वविक्रम रचला आहे.

विशेष म्हणजे, हे पथक देखील जोगेश्वरीचेच आहे. ठाणे शहरातील वर्तकनगर भागात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते.

तर, अनेक दशके उपनगरातील दहीहंडी स्पर्धांमध्ये आपलं वर्चस्व राखणाऱ्या जोगेश्वरीच्या 'जय जवान गोविंदा' पथकाने देखील घाटकोपरमध्ये पराक्रम केला आहे. ज्यामुळे दहीहंडीच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी नवे पर्व कोरले गेले आहे. पथकातील प्रत्येक गोविंदासाठी हा क्षण आयुष्यभर अविस्मरणीय ठरणारा आहे. १० थरांचा विक्रम साध्य करणे सोपं काम नव्हतं. शेकडो गोविंदांची ताकद, काटेकोर नियोजन, न थांबणारी मेहनत आणि शिस्तबद्ध सराव यामुळे हा विक्रम शक्य झाला. दरम्यान, 'जय जवान गोविंदा'च्या गजरात प्रत्येक थर उंचावत गेला. नवव्या थरावर चढताना प्रेक्षकांचा श्वास रोखला गेला आणि दहावा थर पूर्ण होताच जल्लोषाच्या आरोळ्या दुमदुमल्या. या दहा थरांच्या विक्रमानंतर त्यांनी केवळ उपनगरच नव्हे तर संपूर्ण भारतात दहीहंडीच्या इतिहासात आपली अमिट छाप सोडली आहे. जय जवान आणि कोकण नगर गोविंदा पथकांच्या या अभूतपूर्व विक्रमामुळे मुंबईच्या दहीहंडी परंपरेत नवा अध्याय सुरू झाला आहे. हा विक्रम आगामी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

**रसायनी :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील तुराडे आदिवासीवाडी येथे राहणारा सुनील काळूराम वाघमारे याने गळफास घेवून आत्महत्या करण्याची घटना घडली. कोणत्यातरी अज्ञात

•> पान ४ वर




## गावांना सतर्कतेचा इशारा | पावसाने जनजीवन विस्कळीत
# नद्यांनी ओलांडली इशारा पातळी

। रायगड । प्रतिनिधी ।

गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर पुन्हा वाढला आहे. याचाच परिणाम म्हणून कोकण आणि घाटमाथ्यावर अतिमुसळधार पाऊस कोसळत आहे. राज्यातील इतर भागातही पावसाचा जोर असला तरी कोकण, घाटमाथ्यावर पावसाचे प्रमाण अधिक आहे. दरम्यान, मुसळधार पावसामुळे रायगड जिल्ह्यातील नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे.



मागील १५ दिवस पावसाने विश्रांती घेतली होती. त्यानंतर पुन्हा शुक्रवारपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्याला झोडपून काढले आहे. जिल्ह्यात २४ तासात सरासरी ८० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. अंबा आणि कुंडलिका नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असून, नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग भागात गुरुवारपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. या भागात शनिवारी पहाटेपासून पावसाचा जोर पुन्हा वाढला असून रायगड जिल्ह्यातील कुंडलिका आणि अंबा नद्यांनी पाण्याची इशारा पातळी ओलांडली आहे. त्यामुळे रोहा, कोलाड, वाकण, खारघाव, खेड या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, रत्नागिरीसह रायगड, पुणे घाट परिसर, सातारा घाट परिसरात शनिवारी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यानुसार या कालावधीत जोरदार वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. पुणे घाट परिसरातही पावसाचा जोर आहे. धरणक्षेत्रातही पावासाचा जोर वाढला आहे.

मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील नद्यांच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. कुंडलिका आणि अंबा नद्यांनी सकाळी १० वाजता इशारा पातळी ओलांडली आहे. त्यामुळे रोहा आणि नागोठणे परिसराला पूरपरिस्थितीचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. संततधार पावसामुळे जिल्ह्यात सखल भागात पाणी साचणे, वीजपुरवठा खंडित होणे आणि वृक्ष उन्मळून पडणे यासारख्या घटना घडल्या आहेत.

रोहे तालुक्याला शुक्रवार पासून मुसळधार पावसाने पार झोडपून काढले आहे.सलग दोन दिवस पडणाऱ्या पावसामुळे कुंडलिका नदीने

•> पान ४ वर



# ग्राहक विद्युतपुरवठा बंदीच्या जोखडात

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

**तालुक्यातील विद्युतप्रवाह सुरळीत राहण्यासाठी गेल्या दोन मंगळवारी लोडशेडींग घेणाऱ्या महावितरणने स्वातंत्र्यदिनीदेखील पोलादपूर शहरातील काही भागातील ग्राहकांना विद्युतपुरवठा बंदीच्या जोखडामध्ये अडकविल्याचे दिसून आले. यामुळे विद्युत ग्राहक हवालदिल झाल्याचे दिसून आले. स्मार्ट मीटरची सक्ती करण्यासाठी लोडशेडींगची युक्ती महावितरणच्या अभियंत्यांनी अवलंबिल्याची चर्चा यानिमित्ताने होत आहे.**



पोलादपूर तालुक्यातील शहरासह अर्ध्याअधिक ग्रामीण भागात ५ ऑगस्टरोजी तारा ओढणे, जंपर बसविणे तसेच अन्य कामांसाठी महावितरणतर्फे विद्युत पुरवठा बंद ठेऊन दुरूस्तीची कामे करण्यात आली. यानंतर पोलादपूर तालुक्यातील उर्वरित ग्रामीण भागामध्ये १२ ऑगस्ट रोजी याच कामांची पूर्तता करण्यासाठी पुन्हा लोडशेडींग जाहिर करून विद्युतपुरवठा बंद ठेवण्यात आला. या लोडशेडींगमुळे पोलादपूर तालुक्यात सणासुदीच्या काळात विद्युतप्रवाह बंद पडणार नसल्याचे सांगितले गेले.

स्वातंत्र्यदिनासारखा राष्ट्रीय सण असताना सकाळी साडेसहा वाजल्यापासून विद्युतप्रवाह खंडीत झाला. अधिक चौकशी करता पोलादपूर शहरातील भैरवनाथनगर येथील डीपी रोहित्र बंद झाल्याने स्वातंत्र्यदिनीदेखील वीजग्राहक महावितरणच्या विद्युतपुरवठा बंदीच्या जोखडात अडकल्याची माहितीअंती समजून आले.

विद्युतप्रवाह सुरू होण्यासाठी किती काळ लागेल, याबाबत चौकशी करताना विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार डीपी बंद झाल्यास किती दिवसांपर्यंत विद्युतपुरवठा बंद ठेवावा, याबाबत मुभा असल्याची माहिती महावितरणच्या अभियंत्यांकडून सांगण्यात आली.

मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी स्मार्ट मीटर्सची सक्ती विद्युत ग्राहकांवर करता येणार नसल्याचे विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये कथन करूनही पोलादपूर तालुक्यात अभियंत्यांकडून जनमित्रांद्वारे अनेक ग्राहकांना स्मार्ट मीटर्स बसविण्याची सक्ती केल्याचे दिसून येत आहे.

अधिकाधिक ग्राहकांनी स्मार्टमीटर बसवून न घेतल्यास विद्युतपुरवठा बंदीची टांगती तलवार ग्राहकांच्या माथी ठेवण्यात आली आहे. एमइआरसी म्हणजेच महाराष्ट्र विद्युतनियामकआयोगाच्याबाबाआदमच्या जमान्यातील डीपी बसविण्याबाबतच्या निर्देशांनुसार किती दिवसांमध्ये डीपी बसवावा आणि ग्राहकांना विना विद्युतवापराची सवय लावायची, याबाबतचे निकष पुढे करायचे दुसरीकडे विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी अनुदान द्यायचे आणि तिसरीकडे स्मार्ट मीटरच्या सक्तीने ग्राहकांचे आर्थिक शोषण करायचे, हे धोरण ग्राहकांच्या हिताविरोधात असल्याने तालुक्यात संतापाची भावना निर्माण झाली आहे.

पोलादपूर शहरातील आनंदनगर, जुना महाबळेश्वररस्ता, भैरवनाथनगर, चित्रेंची गढी, प्रभातनगर पूर्व वसाहत तसेच प्रभातनगर पश्चिम लोकवस्ती याठिकाणी दिवसभर विद्युतपुरवठा खंडित राहिल्यानंतर याठिकाणी अन्यप्रकारे विद्युतपुरवठा तातडीने सुरू करता येऊ शकत असूनही विद्युत अभियंत्यांनी स्वातंत्र्यदिनी वीजग्राहकांना तब्बल १२ तासांपेक्षा अधिककाळ विद्युतपुरवठा बंदीला सोसण्यास भाग पाडल्याने ग्राहकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.

## स्वातंत्र्यदिनी रक्तदान शिबीर


( संजय गायकवाड)

**। कर्जत । वार्ताहर।**

कन्झ्युमर प्रोडक्ट्स डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशन कर्जत-नेरळ आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे व मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिरात ५२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सार्वजनिकरक्तदाताराजाभाऊ कोठारी यांनी कर्जत- खालापूर तालुक्यात आयोजित केलेले हे ५२० वे रक्तदान शिबीर ठरले. कर्जत शहरातील शनी मंदिराच्या रविकिरण सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजनही करण्यात आले होते.

# पनवेल शहर पोलीस ठाण्यात राबवण्यात आले नशामुक्ती अभियान

**। पनवेल । वार्ताहर ।**

नशा मुक्ती अभियान अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाकरिता पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोलीस निरीक्षक, ६ अधिकारी व १४ पोलीस अमलदार यांनी सहभाग घेतला होता. यावेळी पोलीस अधिकारी यांनी अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम याबाबत उपसताना मार्गदर्शन करून जनजागृती केली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे ते साईनगर परिसरमध्ये पनवेल बोहरी मस्जिद यांचे बँड पथकाकडून रूट मार्च, पनवेल शहर पोलीस ठाणे ते पनवेल शहर परिसरात सायकल रॅली, वडाळे तलाव परिसरात व्ही के हायस्कूल पनवेल एनसीसी विद्यार्थ्यांकडून मानवी साखळी, याकूब बेग हायस्कूल येथे अम ली पदार्थ सेवन दुष्परिणाम या विषयावर व्याख्यान तसेच एक धाव नशा मुक्तीसाठी कार्यक्रम, पाडा मोहल्ला मस्जिद येथे अमली पदार्थ दुष्परिणाम या विषयावर यांना मार्गदर्शन व सूचना, तहसील कार्यालय येथे अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन, बार्न्स कॉलेज येथे अमली पदार्थ सेवन दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन पर चर्चासत्र तसेच अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम याबाबत जनजागृती कार्यक्रम राबवण्यात आले.

## बांधकाम साहित्यांची चोरी

**पनवेल :** पनवेल जवळील पुष्पकनगर दापोली येथील प्लॉट नं २७७ या ठिकाणावरून अज्ञात चोरट्यांनी हजारो रुपये किमतीचे बांधकामाचे साहित्य चोरून नेल्याची घटना घडल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या ठिकाणावरून अज्ञात चोरट्याने ५१ हजार रुपये किमतीचे लोखंडी पाईप तसेच ३० हजार रुपये किमतीचे १ टन वजनाच्या गोल रिंग असा मिळून जवळपास ८१ हजार किमतीचा ऐवज चोरून नेला आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती नागोठण्यात उत्साहात

**। नागोठणे । वार्ताहर ।**

एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक असलेले आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपल्या लेखनाने महत्वाची भूमिका बजावणारे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती येथील रामनगर भागातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे मित्रमंडळाच्या वतीने नुकतीच उत्साहात साजरी करण्यात आली.



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त येथील मुंबई-गोवा महामार्गाच्या लगत असलेल्या रामनगर येथून सकाळी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे मित्रमंडळाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांची भव्य तसवीर घेऊन वाजत, गाजत व नाचत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मित्रमंडळाचे अध्यक्ष लखन माने, उपाध्यक्ष गणेश इचके, खजिनदार संदीप तांबे, सचिव साई माने, सल्लागार श्रीरंग बाभुळकर, सहदेव खंडारे आदींसह मित्रमंडळाचे सर्व सदस्य व समाज बांधव सहभागी झाले होते.

रामनगर, खडकआळी, ग्रामपंचायत मार्गे ही मिरवणूक दुपारी नागोठणे ग्रामपंचायतीच्या शिवगणेश सभागृहात आली. त्यानंतर समाज प्रबोधनपर कार्यक्रम झाल्यानंतर या कार्यक्रमाचा सम ारोप करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे मित्रमंडळाच्या सर्व पदाधिकारी, सदस्य व रामनगर ग्रामस्थांनी मेहनत घेतली.

# महिलांकरीता तालुकास्तरीय श्रावणसरी पारंपरिक नृत्य स्पर्धा

**। रसायनी । वार्ताहर ।**

मंगळागौर हा महाराष्ट्रातील पारंपारिक सण आहे. जो खूप आनंदाने व उत्साहाने साजरा केला जातो. हा सण प्रामुख्याने नवविवाहित महिलांसाठी असतो आणि त्यात गौरी देवीची पूजा करतात, ज्यामुळे त्यांना चांगले वैवाहिक जीवन आणि समृद्धी लाभते. मंगळागौर हा सण महिलांसाठी खूप महत्त्वाचा असतो. हा सण श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी साजरा केला जातो. या दिवशी महिला पारंपरिक वेष परिधान करून देवीची पूजा करतात. पूजेनंतर महिला विविध पारंपारिक खेळ खेळतात.जसे की वटवट, फुगडी, झिम्मा इत्यादी मंगळागौर हा सण केवळ



धार्मिक नसून तो महिलांमधील नातेसंबंध दृढ करतो आणि त्यांना एकत्र आणतो.

मंगळागौर सांस्कृतिक परंपरा दृढ करण्यासाठी तसेच आपापसातील नातेसंबंध वृद्धीगत करण्यासाठी महिलांकरीता खालापूर तालुकास्तरीय श्रावण सरी पारंपारीक नृत्य स्पर्धेचे आयोजन मोहोपाडा येथील जनता विद्यालयाच्या सभामंडपात करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरपंच उमा मुंढे यांच्याहस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमात तालुक्यातील दहा स्पर्धक गटांनी भाग घेतला होता.

यात श्रावणसरी पारंपारीक स्पर्धेत प्रथम क्रमांक ज्ञानाई ग्रुप चांभार्ली यांनी रोख १०,००० व सन्मानचिन्ह पटकाविले,द्वितीय क्रमांक सखी महिला ग्रुप कांबे यांना ७००० रुपये व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक शिवतीर्थ खोपोली यांना ५००० रुपये, उत्तेजनार्थ एकमत ग्रामसंघ तळेगाववाडी यांनी ३००० रुपये व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ आई चामुंडा शेडवली यांना रोख ३००० रुपये व सन्मानचिन्ह पटकाविले.

ज्येष्ठ महिला आई माझी हौशी यात प्रथम क्रमांक इंदिरा पांडुरंग पवार, द्वितीय क्रमांक सीमा मनोहर म्हात्रे, तृतीय क्रमांक वृंदा विवेक ओक, उत्तेजनार्थ प्रभावती पंढरीनाथ बडगुजर, उत्तेजनार्थ निर्मला प्रल्हाद चव्हाण तसेच महिलांसाठी लकी ड्रॉ योजनेत प्रथम शारदा गणेश काळे रिस, द्वितीय क्रमांक अंकीता विशाल लहुजी खोपोली, तृतीय क्रमांक पल्लवी संजय पोठरे यांनी पारितोषिके पटकावली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वासांबे महिला आघाडी अध्यक्षा वर्षा पाटील, पंचायत समिती अध्यक्षा रेश्मा चौधरी, ग्रामपंचायत सदस्या कविता मांडे, सदस्या वनिता पारंगे, सदस्या संगिता भोईर, सदस्या स्वप्नाली मैद्रगीकर, सदस्या ताई पवार, सदस्या रसिका खराडे, सदस्या प्रतिक्षा राऊत, सदस्या वेदीका पाटील, सदस्या प्रशाली खाने आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अंजली जोगत यांचे निधन

**नागोठणे :** नागोठण्यातील गवळ आळी भागातील रहिवासी व गवळ आळी मधील महिला मंडळाच्या प्रमुख आधारस्तंभ असलेल्या अंजली उर्फ बेबीआई गणपत जोगत (वय ७२) यांचे यांचे शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. नागोठण्यातील के.एम. जी.विभागातील गवळी आळीतील ग्रामस्थ आणि प्रसाद डेकोरेटर्सचे मालक प्रसाद जोगत व शेखर जोगत यांच्या त्या मातोश्री होत.



## शेतकरी कामगार पक्षाचा स्मार्टमीटर विरोधात एल्गार



**। उरण । वार्ताहर ।**

स्मार्ट मिटर व प्रिपेड मिटर विरोधात शेतकरी कामगार पक्ष उरण तर्फे महाराष्ट्र राज्य महावितरण विज कार्यालयात कार्यकारी अभियंता गायकवाड यांच्याबरोबर बैठक झाली. यावेळी अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. यापुढे प्रिपेड व स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न केल्यास शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मीटर बसविण्यासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या स्टाईलने हिसका दाखवितील.

यावेळी चिटणीस रवि घरत, नरेश घरत, रमाकांत पाटील, युवक अध्यक्ष विजय कडू, सिताराम नाखवा, महेश म्हात्रे व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# उरण शहरातील समस्यांबाबत तहसीलदारांना निवेदन

**। उरण । वार्ताहर ।**

उरण शहरातील नागरी सुविधा बाबत उरण नगरपालिकेच्या प्रशासकीय उदासीनतेमुळे शहराला समस्या भेडसावीत आहेत यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस शेखर पाटील यांनी १५ ऑगस्ट रोजी शिष्ट मंडळासमवेत तहसील कार्यालयात तहसीलदार डॉक्टर उद्धव कदम यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

यावेळी शेखर पाटील यांनी आपल्या निवेदनात म्हटले की उरण शहर अनेक समस्यांनी ग्रासले आहे. शहरात वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर आहे आनंद नगर ते राजपाल नाका कोट नाका ते विवेकानंद चौकापर्यंत वाहतूक कोंडी होत असते शहरात पाच मिनिटांच्या प्रवासालां अर्धा तास एक तास लागतो.

शहराच्या नागरिकांना चालणे मुश्किल होत आहे. उरण रेल्वे स्टेशन मधून कोट नाका या मार्गावर वाहतूक मोठ्या प्रम ाणात होते याचा ताण शहरावर पडतो.यासाठी नवीन शेवा गावाकडून रेल्वे स्टेशनकडे मार्गीका तयार करावी. त्याचबरोबर कोटा नाका बायपास रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावावे. उरण शहरांमध्ये होणारा रविवारचा बाजार व पिरवाडी समुद्रकिनारी जाण्यासाठी वाहने यामुळे चार फाटा व आनंद नगर परिसर ट्रॅफिक जाम होते. याचे नियमन योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. शहरामध्ये पावसाळा असूनही पाणी समस्या यामुळे नागरिक त्रस्त आहेत.

वाढती लोकसंख्या पाहता एमआयडीसी कडून नगरपालिका क्षेत्रात पाण्याचा दाब क्षमता वाढून घेणे आवश्यक आहे.उरण शहरात आगीचे प्रकार होत असताना स्वतःची अशी अग्निशमन केंद्र उभारावे जेणेकरून आग ताबडतोब आटोक्यात येईल. शहरातील हातगाड्या व फेरीवाले यांसाठी फेरीवाला झोन तयार करावा त्यांना नगरपालिकेने जागा द्यावी, इत्यादी समस्या निवेदनातून मांडल्या. तहसीलदार यांच्या माध्यमातून या समस्या सुटाव्यात, यासाठी तहसीलदारांनी लक्ष घालावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# 'गावातील तंटे गावातच मिटवले जावेत'

**। हमरापूर । वार्ताहर ।**

आपल्या गावातील तंटे हे गावातच मिटवले जावेत, यामध्ये तरुण मंडळी सहभाग घेणे गरजेचे असल्याचे उदगार दादर सागरी पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक संजय कुमार ब्राह्मणे यांनी पेण तालुक्यातील कळवे येथे बोलताना काढले.

कळवे ग्रामपंचायत आयएसओ होत आहे. त्यानिमित्त कळवे येथील श्री विठ्ठल रखुराई मंदिराच्या सभागृहात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वतंत्र दिनाच्या औचित्य साधून गावात सीसिटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. तसेच गावासाठी नवीन घंटागाडी आणण्यात आली आहे. सदर घंटागाडीचे लोकार्पण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी, दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय कुमार ब्राम्हने, सरपंच सतीश पाटील, उपसरपंच निवास पाटील, माजी उपसरपंच श्रीधर म्हात्रे, दिलीप रामा पाटील, भगवान पाटील, प्रमोद पाटील, नितीन पाटील, मनीषा पाटील, राजश्री पाटिल, अंकिता पाटील, कल्पिता पाटील, जयमला पाटील, ग्राम विकास अधिकारी शामल मोकल यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना पोलीस निरीक्षक संजय कुमार ब्राह्मणे यांनी गाव अग्रेसर होण्यासाठी तरुणांचा सहभाग हवा. आजकाल आपल्याला जनरेशन गॅप दिसत आहे हे होता कामा नये. ज्येष्ठ मंडळींसोबत तरुणांनी देखील गावाच्या विकासासाठी आपले योगदान द्यायला पाहिजे. गावात कोणताही वाद विवाद होता कामा नये ते गावातच मिटवले जावेत. तर पालकांनी आपल्या मुलांना चांगले संस्कार द्यावेत प्रत्येकाने आपल्या भावनांवर संयम ठेवायला हवा. स्त्रियांची सुरक्षितता ही महत्त्वाची आहे त्यामुळे त्या दृष्टीने सर्वांनी दक्ष रहावे. तर पुढील घटना टाळण्यासाठी गणपती व्यवसायिकांनी गावाच्या महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.

गटविकास अधिकारी गजानन दिंडी यांनी तालुक्यात आयएसओ होत असणारी कळवे ही पाचवी ग्रामपंचायत आहे. गावचे सरपंच सतीश पाटील व त्यांचे सहकारी चांगले काम करत आहेत. गावात विकासात्मक व लोकोपयोगी




कामे होत आहेत त्याचा फायदा सर्वांनाच होत आहे. मात्र या सर्वांमध्ये गावाचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे असे सांगून पंचायत समितीकडून गावाच्या विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल असे त्यांनी सांगितले. यावेळी लवेंद्र मोकल यांनीही आपले विचार मांडले. जेएसडब्लू कंपनी असपायर डोलवी मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या मेघा कार्लेकर, पूजा म्हात्रे यांचे मुलांना अभ्यासात प्रगती होण्यासाठी क्लासचे सहकार्य करत असल्याबद्दल त्यांचा तसेच गावातील इतर व्यक्तींचा मदत केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

# पत्रकार कुडेकर हल्ला प्रकरणी तिघांना अटक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथील पत्रकार प्रथमेश कुडेकर हल्ला प्रकरणी कर्जत पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे.या हल्ल्याप्रकरणी १४ दिवसांनी पोलीस हल्लेखोर यांच्यापर्यंत पोहचले असून आणखी तीन आरोपींचा शोध कर्जत पोलिस घेत आहेत. दरम्यान या घटनेप्रकरणी कर्जत तालुक्यातील पत्रकारांनी पोलीस उप अधिक्षक यांची भेट घेऊन पत्रकार हल्ला विरोधी कायद्या नुसार गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

पत्रकार प्रथमेश कुडेकर हल्ला प्रकरणी कर्जत येथे पोलीस उप अधिक्षक राहुल गायकवाड यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी कर्जत पोलिस ठाण्याचे



निरीक्षक संदीप भोसले यांच्या सह घटनेची माहिती दिली एक ऑगस्ट २०२५ रोजी पत्रकार प्रथमेश कुडेकर आणि त्यांचे सहकारी मयूर रणदिवे ह्यांच्यावर चार फाटा परिसरात काही अज्ञात इसमांनी प्राणघातक हल्ला केला होता. लोखंडी रॉड, फायटर आणि सापळा पद्धतीने केलेल्या ह्या हल्ल्यात पत्रकार प्रथमेश कुडेकर यांना गंभीर दुखापत झाली होती. राहुल गायकवाड यांनी माहिती देताना कर्जत पोलीस ठाणे येथील पोलिसांनी अधिक तपास करून काही तांत्रिक मुद्द्यांद्वारे घटनास्थळ परिसर, खोपोली, खालापूर, चौक, नेरळ आणि द्रुतगती मार्गासह, शेडुंग टोलनाका परिसरातील असंख्य सीसीटीव्ही तपासून या गुन्ह्यातील आरोपींना निष्पन्न करण्यात पोलिसांना यश आले.

या गुन्ह्यात आत्तापर्यंत कर्जत आणि महाड येथून एकूण तीन आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित चार आरोपींचा शोध पोलीस घेत आहे. अटक केलेल्या तीन आरोपीना न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती आणि १५ ऑगस्ट रोजी आरोपींना जामीन मिळालेला आहे.आरोपींनी गुन्ह्याकरिता वापरलेली एक मोटारसायकल आणि एक मारुती वॅगन आर कार जप्त करण्यात आलेली आहे.या गुन्ह्याच्या तपासात कर्जत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे, पोलिस उप निरीक्षक सुशांत वरक, पोलिस उप निरीक्षक किरण नवले, पो.ह स्वप्नील येरुणकर, पो.ह. समीर भोईर, पो.ना.प्रवीण भालेराव, विठ्ठल घावस, पो.ह. सागर शेवते हे करीत आहेत.

या प्रकरणामुळे पत्रकार सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून पत्रकार प्रथमेश कुडेकर हल्ला हा एका पत्रकारावर झालेला हल्ला असून त्या बाबतचा गुन्हा पत्रकार हल्ला विरोधी कायद्या अंतर्गत दाखल व्हावा अशी मागणी केली.

# विसरून राहिलेली पैशाची पिशवी रेल्वे प्रवाशाला परत


( संजय गायकवाड)

**। कर्जत । वार्ताहर ।**

कर्जत रेल्वे स्टेशन येथे कर्जतला येणाऱ्या लोकल गाडीच्या मुंबई बाजूकडून चौथ्या जनरल डब्यामध्ये एक काळया रंगाची प्लास्टिक पिशवी राहिली असल्याचे कळविण्यात आले. त्यानुसार पोलीस शिपाई गोरख मासाळ व होमगार्ड मोहिनी जाधव, कल्याणी काळेकर, प्रणाली गोळे यांनी त्या लोकल गाडीची तपासणी केली असता ती पिशवी मिळाली.

ही पिशवी रेल्वे पोलीस ठाण्यात जमा केली. तेथील ठाणे अंमलदार महिला पोलीस हवालदार सुमित्रा दोंदे यांनी ज्यांची पिशवी विसरून राहिली होती त्या सय्यद जावेद जफर आबीदी यांची सविस्तर चौकशी करून त्या वर्णनाची पिशवी व २१ हजार रुपयांसह परत केली.

# जिल्ह्यात दहीहंडी उत्सवाचा जल्लोष

**। अलिबाग । प्रतिनिधी । गोपाळकाळा सणानिमित्त रायगड जिल्ह्यात दहीहंडीचा उत्सव साजरा करण्यात आला. यंदा जिल्ह्यामध्ये ८ हजार ९७९ दहहंड्या फोडण्यात आल्या. यावेळी जिल्ह्यातील ३५५ ठिकाणी मिरवणूका काढून उत्सव साजरा करण्यात आला. काही ठिकाणी सांस्कृतिक तर काही ठिकाणी बाल्या नृत्यांचे सादरीकरण करीत पारंपारिक नृत्याचे दर्शन घडवून आले. अनेक ठिकाणी गोविंदा पथकांनी साखळी करीत संपुर्ण गावात तसेच शहरातील गल्लीत जाऊन दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम जल्लोषात साजरा केला. या उत्सवात महिलादेखील सहभागी झाल्या होत्या. लहान मुलांबरोबरच तरुणाईनेसुद्धा या उत्सवाचा आनंद घेतला.**

## पारंपरिक गोपाळकाला उत्साहात

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यात गोकुळाष्टमी आणि गोपाळकाला पारंपारिक पेहराव व पारंपरिक वाद्यांच्या तालावर उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पाली, जांभूळपाडा, परळी, पेडली इत्यादी ठिकाणी दहीहंडीची धूम पहायला मिळाली. विशेष म्हणजे जांभूळपाडामध्ये गोविंदाच्या अंगावर आसुडाचे फटके मारत दहीहंडी फोडण्याची परंपरा यंदाही जपण्यात आली.

सुधागडातील आदिवासी वाड्या व पाड्यांवर देखील गोपाळकाल्याचा उत्साह पहायला मिळाला. छोट्या मोठ्या दहीहंडी फोडण्याचा थरार देखील अविस्मरणीय होता. नृत्याचा ठेका धरत, गाणी म्हणत हे गोपाळ घरोघरी जात होते. त्याठिकाणी दहिकाला व फळे प्रसाद म्हणून तर अंगावर पाणी ओतून त्यांचे स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे यंदा गोपाळकल्याला पावसाने हजेरी लावल्याने दहीहंडीचा उत्साह द्विगुणित झाला. बालगोपाळांसह गोविंदांनीजोरदार पाऊसात दहीहंडी फोडण्याची मज्जा लुटली.



■ जांभूळपाड्याने जपली परंपरा

■ अंगावर आसूड मारत फोडली दहीहंडी

जांभूळपाड्यात दहीहंडीची अनोखी प्रथा, दहीहंडी साजरी करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आणि रिती आहेत. मात्र, अंगावर आसुडाचे म्हणजे चाबकाचे फटके मारून दहीहंडी साजरी करणारी प्रथा ही सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथे जपली जाते. अशा प्रथेतून दहीहंडी साजरी केली जाते. तसेच, गोविंदांच्या अंगात कान्होबाचा वारा येतो आणि हे सर्वजण घुमायला सुरुवात करतात. महिला त्यांची पूजा अर्चा करतात आणि मग गोविंदा आसुडाचे फटके अंगावर मारून घेत गावभर फिरतात. ही परंपरा केव्हापासून सुरु झाली हे सांगता येत नाही; मात्र, मागील कित्येक वर्षांपासूनची ही परंपरा जांभूळपाडा ग्रामस्थांनी आजही जपली आहे.



● अलिबाग– गोंधळपाडा येथील गावदेवी गोविंदा पथकाने सहा थर रचून दहीहंडी फोडली. (छाया: समीर माल्लोदे)

## माणगावात दहीहंडीनिमित्त बहारदार नृत्य




**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही दहीहंडी सण शनिवार (दि.१६) उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी माणगाव तालुक्यात अनेक गावांतून मोठ्या प्रमाणात दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या. मुसळधार पावसामुळे गोविंदाचा उत्साह ओसांडून वाहत होता. डीजेच्या तालावर गोविंदा उत्साहात नाचत होता. यादरम्यान, 'आला रे आला गोविंदा आला'च्या तालावर लहान मुलांसह ज्येष्ठांपर्यंत सर्वांनीच ठेका धरला होता. दहिहंडीबरोबरच आर्केस्ट्राने व सेलिब्रेटींच्या बहारदार नृत्याने उपस्थित रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. प्रेक्षकांच्या टाळ्यांचा व आलेल्या गोविंदांच्या नृत्यामुळे सेलिब्रेटींचा उत्साह देखील अधिक द्विगुणित झाला. यावेळी दहीहंडी उत्सवात सेलिब्रेटी पूनम कुडाळकर व रक्षा पुणेकर हे मुख्य आकर्षण होते. दुसऱ्या दहीहंडी उत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम प्लॅनेट आर्ट प्रस्तुत दहीहंडी धमाकामधील सेलिब्रेटी कलाकारांनी बहारदार नृत्य सादर करीत उपस्थित रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.

## महाडमध्ये गोविंदा पथकांची चढाओढ

**। महाड । प्रतिनिधी ।**

गोपाळकाला सण साजरा होत असताना संपूर्ण जिल्ह्यात मुसळधार पाऊसाने दमदार हजेरी लावली. तरीदेखील महाड तालुक्यातील गोविंदा पथकांचा उत्साह मात्र कायम होता. यावेळी शहरासह ग्रामीण भागामध्ये पारंपारिक पद्धतीने आणि मानवी थर लावून दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांची चढाओढ लागली होती.

महाड तालुक्यामध्ये आजही प्रत्येक गावामध्ये पारंपारिक पद्धतीने दहीहंडी साजरी केली जाते. यंदाही भजन कीर्तनाबरोबरच पारंपारिक नृत्यांमधून गोपाळकाला साजरा केला गेला. ढोल ताशांच्या गजरामध्ये नृत्य करत गोकुळाष्टमी साजरी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर शहरात तसेच तालुक्यामध्ये चोख पोलीस बंदोबस्त देखील ठेवण्यात आला होता.



## कृष्णाष्टमीला रंगले पारंपरिक खेळ

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथील पेशवेकालीन श्री लक्ष्मीनारायण मंदिरात ब्राह्मण व प्रभू समाजाकडून श्रीकृष्ण जन्मोत्सवनिमित्त सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. विशेषतः काल्याचे किर्तन आटोपल्यावर संतांचे अभंग व त्या जोडीला पेटी, नाल व टाळांच्या गजरात पुरुषवर्गाकडून विविध खेळ खेळण्यात आले.

प्रतिवर्षा प्रमाणे शुक्रवार (दि.१५) ते रविवार (दि.१७) या तीन दिवसांत चिपळूण येथील महेश बुवा काणे यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन श्री लक्ष्मीनारायण मंदिरात करण्यात आले होते. श्रीकृष्ण जन्म किर्तन, काल्याचे कीर्तन व पुरुषांचे पारंपरिक खेळ, महाप्रसाद व लळीताचे कीर्तन असे श्रीकृष्ण जन्मोत्सव निमित्त कार्यक्रम पार पडले.



### मृदंगाच्या गजरात खेळ

**श्रीकृष्ण जन्मोत्सवादरम्यान काल्याचे किर्तन आटोपल्यावर पुरुष वर्गाकडून संत तुकाराम, संत एकनाथ व संत जनाबाई यांच्या अभंगावर रचलेले विविध खेळ खेळले गेले. पेटी, नाल, टाळांच्या गजरात व जय कृष्ण कृष्णाच्या ठेक्यावर हमामा, हुंबरी, दळण कांडण, फुगडी दंड, फुगडी, बस फुगडी असे अंगात जोश व ताकद आणणारे खेळ खेळण्यात आले. श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे नियोजन श्री लक्ष्मी नारायण देवस्थान ट्रस्ट यांच्यामार्फत करण्यात आले होते. पारंपरिक खेळ बघण्यास स्थानिकांनी आवर्जून हजेरी लावली होती.**



## मुनवलीत ज्येष्ठांचा सहभाग

**। सोगाव । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील मुनवली येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा दहीहंडी उत्सव शनिवारी (दि.१६) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुनवलीतील गोविंदानी सकाळपासूनच पारंपरिक 'गोविंदा आला रे आला' व इतर पारंपरिक गीतांसह संगीत वाद्याच्या ठेक्यावर साखळी धरून भरपावसात एकूण ७ पेक्षा जास्त दहिहंड्या फोडत श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा केला. आदल्या दिवशी ग्रामस्थांनी श्री हनुमान मंदिरात भजन सप्ताहाचे आयोजन केले होते. दहीहंडी उत्सव आनंदात व शांततेत साजरा करण्यासाठी सचिन घाडी व त्यांच्या मित्रमंडळाचे कार्यकर्ते यांनी विशेष काळजी घेतली. या उत्सवात बाळ गोपाळांसोबत तरुण मंडळी, ज्येष्ठ नागरिक व महिलावर्ग यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.



● अलिबाग तालुक्यातील वेश्वी-गवळीवाडी श्रीकृष्ण महिला गोविंदा पथकाने थरावर थर रचून दहीहंडी फोडली.



● अलिबाग तालुक्यातील वेश्वी-गवळीवाडी येथील श्री राधा कृष्ण मंदिरात श्रीकृष्ण जन्मोस्तव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महिलांकडून पाळणा गीते गाण्यात आली. (छायाचित्र: समीर मालोदे)

## बाळसईत ढोल-ताशांचा गजर

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात सर्वत्र दहीहंडी उत्सव अतिशय उत्साहात व जल्लोषमय वातावरणात साजरा करण्यात आला. बाळसई गावामध्ये देखील दहीहंडी उत्सव उत्साही वातावरणात पार पडला. काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने देखील गोविंदावर कृपा करीत सकाळपासूनच दमदार हजेरी लावल्यामुळे गोविंदामध्ये उत्साह संचारला होता.

यावेळी गोविंदानी साखळी पकडुन ढोल-ताशांच्या गजरात तसेच 'बोल बजरंग बली की जय'च्या तालावर ठेका धरला होता. त्याचप्रमाणे पारंपारिक परंपरा म्हणुन सुरू असलेल्या अनेक कान्होबा भक्तांच्या अंगात कान्होबाचे वारे देखील आले होते. मानाची हंडी फोडल्यानंतर गावातील इतर बांधण्यात आलेल्या ५ ते ६ दहीहंड्या देखील फोडण्यात आल्या.






● पनवेलच्या लाईन आळीतली साडेतीनशे वर्ष जुनी देवाची हंडी फोडण्यात आली. यावेळी मुंबईसह नवी मुंबईतून आलेले भाविक या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झाले. (छायाचित्र: राजेश डांगळे)



● अलिबागमधील चेंढरे येथील श्री कानिफनाथ मठात एकत्रित लावलेल्या दहीहंडी सोरट मारुन फोडताना कान्होबा. (छायाचित्र: समीर मालोदे)



● म्हसळा तालुक्यात सर्वत्र गोविंदा उत्सव शांततेत पार पाडण्यात आला. कुंभार आळी गोविंदा पथकातील बालगोपाळांनी दहीहंडी फोडण्याचा मनसोक्त आनंद घेतला. (छायाचित्र: उदय कळस )

## मापगांवकरांनी वाद्यावर धरला ठेका

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मापगांव येथे गावातील बालगोविंदांसह सर्व स्तरातील मुले, मुली यांनी गावातील प्रत्येक आळी, वरचा पाडा, खालचा पाडा आदी ठिकाणी श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी केली. त्या निमित्ताने २५ पेक्षा जास्त दहीहंड्या फोडण्यात आल्या. पारंपरिक गीते व संगीत वाद्यावर आलेल्या पावसाच्या सरीमध्ये भिजत लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सहभागी झाले होते. या भागातील गावात काही ठिकाणी सकाळी तर काही ठिकाणी दुपारी दहीहंड्या फोडण्यात आल्या.



पान १ वरून

# जिल्ह्यात गोविंदांचा थरार

सरपंच दत्ता ढवळे, अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, ॲड, रवि थोरात, अशिष रानडे, विकास घरत, अलिबाग अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोरे, आदींसह माजी नगरसेवक, प्रशांत नाईक मित्र मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते उपस्थित होते.

या सोहळ्यामध्ये एकूण ५३ गोविंदा पथकाने सहभाग घेतला. त्यात २९ पुरुष गोविंदा पथक व २४ महिला गोविंदा पथकाचा समावेश होता. अलिबागमधील पाचनाका महिला गोविंदा पथकामार्फत दहीहंडी सलामीला सुरुवात झाली. त्यानंतर कानिफनाथ महिला गोविंदा पथक तसेच मी अलिबागकर महिला गोविंदा पथकामार्फत संध्याकाळपर्यंत पाच थरांचे मानवी मनोरे उभारून यशस्वी सलामी देण्यात आली. त्यानंतर अलिबागमधील मेटपाडा येथील श्री मरीआई गोविंदा पथकाने (पुरुष) पहिल्याच फेरीला आठ थरांचे मनोरे उभारून एक वेगळा इतिहास केला. त्यावेळी जल्लोष साजरा करण्यात आला. त्यानंतर गावदेवी महिला गोविंदा पथक भुते मार्फत चार थरांची तसेच गावदेवी पुरुष गोविंदा पथक भुते मार्फत सहा थरांची सलामी देण्यात आली. श्रीदत्त पुरुष गोविंदा पथकाने सहा थरांची सलामी दिली. सलामी देणाऱ्या गोविंदा पथकांना पारितोषिक आणि चषक देऊन गौरविण्यात आले.

आला रे आला गोविंदा आला... , शेकापच्या हंडीची वेगळीच हवा... अशा अनेक गोविंदाच्या गाण्यांचा आनंद डिजेवर घेण्यात आला. डिजेच्या ठेक्यावर अनेकजण थिरकले. अलिबाग तालुक्यातील पेझारी व कुर्डूस येथे शेकाप पुरस्कृत दहीहंडीचा थरार शनिवारी दुपारपासून पहावयास मिळाला. या सोहळ्याचा आनंद अनेकांनी मनमुरादपणे लुटला.

**जिल्ह्यात नऊ हजार हंड्या फोडल्या**

जिल्ह्यामध्ये आठ हजार ९७९ दहहंड्या फोडण्यात आल्या गोपाळकाळा निमित्त जिल्ह्यात ३५५ ठिकाणी मिरवणुका काढून उत्सव साजरा करण्यात आला. काही ठिकाणी सांस्कृतिक तर काही ठिकाणी बाल्या नृत्यांचे सादरीकरण करीत पारंपरिक नृत्याचे दर्शन घडवून आले. अनेक ठिकाणी साखळी करीत संपूर्ण गावात, शहरातील गल्लीत जाऊन दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम जल्लोषात साजरा केला. या उत्सवात महिलादेखील सहभागी झाल्या होत्या. लहान मुलांबरोबरच तरुणाईंनीसुध्दा या उत्सवाचा आनंद घेतला.

**पारंपारिक खेळाला एक व्यासपिठ**

रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग, पाली, माथेरान, दादर, खोपोली, मुरूड, महाड, नागोठणे, रोहा, कर्जत, नेरळ, पेण, श्रीवर्धन, माणगांव, पनवेल, उरण अशा अनेक ठिकाणी राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, मित्र मंडळ, फाऊंडेशनच्या माध्यमातून दहीहंडी स्पर्धा आयोजित करण्यात आली. दुपारी एक वाजल्यापासून सुरु झालेल्या या सोहळ्यात पाच हजारापासून तीन लाखांपर्यंत बक्षिसे गोविंदा पथकासाठी ठेवण्यात आली. बक्षिसांसह करोडोची उलाढाल बक्षिसांवर झाली असून सलामी देणाऱ्या पथकांवरही लाखो रुपये खर्च करण्यात आले आहे.

# तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

कारणामुळे सुनील काळूराम वाघमारे याने तुराडे आदिवासी येथील धापड्याची माळ येथील करंजाच्या झाडाला नॉयलॉनच्या रस्सीने गळफास घेवून आत्महत्या केली. त्याची काहीएक हालचाल होत नसल्याने त्यास ग्रामीण रूग्णालय चौक येथे दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याबाबत रूपेश काळूराम वाघमारे याने रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असून आकस्मात मृत्यू बीएनएस १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे.याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रमोद जाधव अधिक तपास करीत आहेत.

# अलिबाग कोळीवाडा गोविंदा पथक ठरला विजेता

प्रशांत नाईक मित्र मंडळाच्या अलिबाग कोळीवाडा गोविंदा पथकाने सात थरांची दहीहंडी फोडून मान मिळविला. या पथकाला ५१ हजार १११ रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले.

शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड गौतम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत दहीहंडी सोहळ्याचा उद्घाटन समारंभ दुपारी झाला. या उत्सवात एकूण ३७ गोविंदा पथकाने सहभाग घेतला होता. त्यात २५ पुरुष गोविंदा पथक व १२ महिला गोविंदा पथकाचा समावेश होता. महिला गोंविदा पथकाला चार थरांची तर पुरुष गोविंदा पथकाने पाच थरांची सलामी होती. अनेक गोविंदा पथकांनी चार ते पाच पेक्षा अधिक थर रचून सलामी दिली. दहीहंडीचा थरार पाहण्यासाठी खारेपाटातील असंख्य प्रेक्षकांनी गर्दी केली होती. मानाचा, प्रतिष्ठेची दहीहंडी सोहळ्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. उत्तम नियोजन, व्यवस्थापनामुळे हा सोहळा उत्साहात पार पडला. अलिबाग कोळीवाड्यातील गोविंदा पथकाने अंतिम फेरीत सात थरांची दहीहंडी फोडून विजेतपद मिळविले. या गोविंदा पथकाला ५१ हजार १११ रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, सुरेश पाटील, मृदूल म्हात्रे, अमरनाथ पाटील, अनिल म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, उमेश पाटील, अरविंद पाटील, संदेश पाटील, राजेंद्र पांचाळ, अजित हरवडे, दिनेश पाटील, शुभम भगत, कौस्तुभ पाटील, प्रणित म्हात्रे, जय पाटील, भूषण म्हात्रे, दिगंबर म्हात्रे, अतुल पाटील आदी मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला उपस्थित होते.

# विद्युत वाहिनीने महिलेचा मृत्यू

आल्यावर त्यांनी आरडाओरड केल्यावर गावातील लोक जमा झाले, तातडीने वीज वितरण कंपनीच्या लोकांना पाचारण करून वीजप्रवाह बंद केला, घटनेची माहिती मिळताच जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार,चौक प्रभारी विशाल पवार, पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे,उप कार्यकारी अभियंता महादेव मुंडे, सहाय्यक वीज अभियंता योगेश देसाई यांना कळविल्यावर सर्वांनी घटनास्थळी धाव घेतली.पंचनामा करून मृतदेह वैद्यकीय तपासणी साठी ग्रामीण रुग्णालय चौक येथे पाठविण्यात आला. सदर महिलेचा मृत्यू वीजवितरण यांच्या हलगर्जीपणामुळे व वेळीच तारांची दुरुस्ती न केल्यामुळे झाला असा आरोप ग्रामस्थ यांनी केला असून योग्य ती नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे दोन खांबांच्या मधील विद्युत वाहिन्यांना आठ आठ जोड दिले आहेत, त्यामुळे या वाहिन्या आणखी कमजोर होऊ न गेल्या आहेत.या परिसरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठा बाबत अनेक पक्षांनी मोर्चे काढले, तीव्र निषेध व्यक्त केला, पाचच दिवसांपूर्वी अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांची संयुक्त बैठक चौक येथे घेतली होती, तरीही यात सुधारणा न झाल्याने परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या परिसरातील जांभिवली या गावातच फक्त श्रीकृष्ण मंदिर आहे.त्या निमित्ताने उत्सव साजरा होत असताना या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे. येणाऱ्या गणेशोत्सव काळात अशी घटना घडू नये, योग्य ती दुरुस्ती करावी अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे यांनी माध्यमांशी बोलताना केली आहे.

# विक्रोळीत कोसळली दरड

पावसाला सुरुवात झाली आहे. पार्कसाईट येथील वर्षा नगर विभागातील जनकल्याण सोसायटीमधील मिश्रा कुटुंबाच्या घरावर शुक्रवारी मध्यरात्री २ च्या सुमारास अचानक डोंगराचाच्या मोठा भाग कोसळला. मिश्रा कुटुंबीय गाढ झोपेत असताना ही घटना घडली. शेजाऱ्यांनी तात्काळ दुर्घटनेची माहिती महापालिका आणि अग्निशमन दलाला दिली. अग्निशमन दलाचे जवान आणि महापालिका कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्य सुरू केले.

डोंगरावरून मोठ्या प्रमाणात मातीचा ढिगारा घरावर कोसळला असून सध्या हा ढिगारा उपसण्याचे काम सुरू आहे. मातीच्या ढिगाऱ्याखालून सुरेशचंद्र मिश्रा, आरती मिश्रा, ऋतुराज मिश्रा आणि शालू मिश्रा या चौघांना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना घाटकोपरमधील राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच सुरेशचंद्र मिश्रा आणि शालू मिश्रा या बाप लेकीचा मृत्यू झाला. तर आरती आणि ऋतुराज हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पार्कसाइट भागातील डोंगरावर वर्षा नगर वस्ती असून या ठिकाणी वारंवार आशा घटना घडत असल्याने नगरिकामध्ये भीतीचे वातावरण आहे. सध्या घटनास्थळी राडारोडा हटविण्याचे काम सुरू आहे. तसेच सुरक्षिततेच्या उपाययोजना म्हणून आजूबाजूची घरे रिकामी करण्यात आली आहेत.

# दहीहंडी बांधताना तरुणाचा मृत्यू

सोडण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पश्चिम उपनगरामध्ये सहा जण जखमी झाले आहेत. एकावर रुग्णालयामध्ये उपचार सुरू असून, पाच जणांना उपचार करून घरी सोडण्यात आले. दरम्यान, थरावरून कोसळून जखमी झालेल्या गोविंदाची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

**या रुग्णालयात गोविंदांवर उपचार**

जखमी गोविंदांपैकी पाच जणांवर केईएम रुग्णालयामध्ये उपचार करण्यात आले. नायर व शीव रुग्णालयामध्ये प्रत्येकी एका गोविंदावर उपचार करण्यात आले. जोगेश्ववरीतील ट्रॉमा रुग्णालयामध्ये तीन आणि अन्य उपनगरीय रुग्णालयांमध्ये दोन जणांवर उपचार करण्यात आले. त्याचप्रमाणे जी.टी. रुग्णालय व सेंट जॉर्जेस रुग्णालयामध्ये प्रत्येकी एका गोविंदावर उपचार करण्यात आलेत. या दोन्ही व्यक्तींच्या डोक्याला मार लागला आहे.

# नद्यांनी ओलांडली इशारा पातळी

इशारा पातळी ओलांडली असून नदी तुडुंब भरून वाहत आहे. मागील अनेक दिवस विश्रांती घेतल्यानंतर शुक्रवार पासून पाऊस पुन्हा एकदा सक्रिय झाल्याने साऱ्यांची दाणादाण उडाली आहे.संततधार कोसळणाऱ्या पावसाने रोहे शहर व तालुक्यातील ग्रामीण भागाला चांगलाच फटका बसला आहे.विश्रांतीनंतर अचानक सक्रिय झालेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली आहे.रोहे शहराप्रमाणे चणेरा,भालगाव,कोलाड, सुतारवाडी,नागोठणे, सुकेळी खिंड या भागात देखील पावसाने पुन्हा एकदा दमदार हजेरी लावली.सतत पडणाऱ्या पावसामुळे या भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर दुसरीकडे कुंडलिका नदीत पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाली आहे.

मुळशी, रवाळजे परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे भीरा जलविद्यूत प्रकल्पाचे तीन दरवाजे उघडण्यात आले असून, प्रतिसेकंद ६२ घन मीटर वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे कुंडलिका नदीच्या पातळीत आणखिन वाढ होण्याची शक्यता आहे. सावित्री, पाताळगंगा आणि उल्हास नद्यांच्या पातळीत वाढ झाली आहे.

दरम्यान पुढील दोन दिवस जिल्ह्यात पावसाचा जोर कायम राहील असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

जिल्ह्यात जून ते ऑगस्ट या कालावधीत सरासरी २ हजार ३१३ मिलीमीटर पाऊस पडतो, त्या तुलनेत यंदा १ हजार ५५१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत यावर्षी जिल्ह्यात ६७ टक्के पाऊस पडला आहे. ही एक चिंताजनक बाब आहे. गेल्या वर्षी याच १५ ऑगस्ट पर्यंत २ हजार ३७२ मिलीमीटर पाऊस पडला होता. म्हणजेच सरासरीच्या तुलनेत अधिक पावसाची नोंद झाली होती. यावर्षी मात्र पावसाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे.

**कमी दाब क्षेत्र**

बंगालच्या उपसागरातील कमी दाब प्रणालीमुळे राज्यात पावसाने जोर धरला आहे. त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून राज्यात पावसाचा जोर वाढला आहे.उत्तर आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यालगत कमी दाब क्षेत्र सक्रिय असून, त्याला लागून समुद्रसपाटीपासून ७.६ किलोमीटर उंचीपर्यंत चक्राकार वारे वाहत आहेत. मान्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा बिकानेरपासून, कोटा, रायपूर, उत्तर आंध्र प्रदेशाच्या किनाऱ्यालगत असलेल्या कमी दाब क्षेत्राच्या केंद्रापर्यंत सक्रिय आहे. ईशान्य अरबी समुद्रात गुजरात आणि कोकणाच्या किनारपट्टीलगत चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. दक्षिण महाराष्ट्र, तेलंगणा ते कमी दाबाच्या केंद्रापर्यंत ३.१ ते ४.५ किलोमीटर उंचीपर्यंत हवेचा पूर्व-पश्चिम कमी दाबाचा पट्टा कायम आहे.


## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.भगवान सिताराम ऐनकर, पत्ता- मु.पो.खांडस, ता.कर्जत, जि.रायगड- ४१०२०१ यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे खांडस, ता.कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./ हि. नं. | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.हरेश अमृतलाल शहा,<br>श्रीम.पौर्णिमा अशोक मुजुमदार,<br>श्री.अशोक गुरूनाथ मुजुमदार | ७४/३८ | ००-३१-०० | ०-२८ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १७/०८/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं.९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री रविंद्र मोहन निगुडकर व गायत्री रविंद्र निगुडकर यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे.जांमरूंग तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नं/ हिस्सा नं | क्षेत्र (चौ.मी ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १. रविंद्र मोहन निगुडकर<br>२. गायत्री रविंद्र निगुडकर | ६२/५ | ०-२४-०० | ०-१७ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता.१७/०८/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड निलेश कान्हू मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता - शॉप नं २९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड.
कर्जत ता कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक नाजुका अविनाश चौधरी यांचेकडून खरेदी घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. वर नमूद व्यक्तींनी मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे मापगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १५/३ | ००-३०-१०<br>पैकी<br>००-१५-०५ | ६.४३<br>पैकी<br>३.३४ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १६/०८/२०२५

**ॲड.रविंद्र वि.ओक**
"गुरूकृपा" अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.




# आरोग्य शिबिरातून प्रेरणा मिळत : अविनाश भोईर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका शिवक्रांती सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविले जातात. मात्र त्यातही आरोग्य शिबिरातून जनतेची रुग्णसेवा करण्याचा उपक्रम महत्वाचा आहे असे प्रतिपादन शिवक्रांती संघटनेचे तालुका अध्यक्ष अविनाश भोईर यांनी केले.

कर्जत तालुक्यातील वारे ग्रामपंचायतीमधील नवसुची वाडी येथे शिवक्रांती संघटनेचे वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. नेरळ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे आरोग्य पथकाने रुग्णांची तपासणी केली.वैद्यकीय सेवेसाठी डॉ. विवेक भगत, डॉ. क्षितिजा ढोले,राही परब, राजेंद्र भोईर, डॉ. आदेश शिंदे, डॉ. गणेश खताले, तृप्ती काटे यांनी योगदान दिले. तसेच विनोद भोईर, डॉ. विशाल केवारी, सुरेश केवारी, संजय होले, प्रकाश कांबडी, हनुमान सराई, शिवाजी कडाळी, आशा सेविका भागुबाई कडाळी, विमल पारधी, वनिता भालेराव आणि तेजस्वी भोईर यांचे महत्वाचे सहकार्य लाभले.

आरोग्य शिबीर यशस्वी होण्यासाठी हर्षद कांबरी तसेच जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक पवार तसेच शिक्षक जाधव यांचे सहकार्य लाभले तर शिबिरात तब्बल ८० रुग्णांनी आपली तपासणी केली.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वाकस, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक १) रामदास काशिनाथ भागीत व २) उज्वल महेंद्र गवळी यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४९<br>जूना सर्व्हे नं.८३ | २२ | ०-२१-०० | ०-२५ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.१७/०८/२०२५.

**ॲड.सतीश धर्मा डायरे,**
पत्ता -००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.९८५०४०२६५७.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे चांदई, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अनंत कमळू कोळंबे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे चांदई, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ५३ | १३ | ०-२९-०० | ०-३१ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१७/०८/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

दिनांक : १७ ऑगस्ट २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतींच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बीडखुर्द, ता.खालापुर, जि.रायगड येथील जमीन मिळकती :-**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर.चौ. मीटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| परशुराम सखाराम केदारी व इतर ८ | २४ | ५/ब/२ | ०-२०-७० | ३ | २५ |
| | २५ | ८ | ०-०५-०० | ० | १० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही / -
**ॲड.अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :-१७/०८/२०२५
मो. नं. ९९२२३६८१२१

कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल श्रीमती हरीन्दर राज कुमार राज पुट, रा.फ्लॅट नं.ए -३०१, श्री होम्स, प्लॉट नं.१७३, कुकशेत गाव, सेक्टर १४, नेरूळ (प.), नवी मुंबई, नेरूळ नोड-३, ठाणे, ४००७०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली सदनिका मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पाषाणे, ता.कर्जत, जि.रायगड, येथील सदनिका मिळकत**

मौजे पाषाणे, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जुना सर्व्हे नंबर २१३/३, नवीन सर्व्हे नंबर १४६/३ या जमिन मिळकतीवर बांधकाम करण्यात आलेल्या "रॉयल हेरिटेज" या इमारतीमधील सहाव्या मजल्यावरील सदनिका नं.६०३, क्षेत्र २७.७८९ चौ.मी. कारपेट.
(ग्रुप ग्रामपंचायत पाषाणे घर क्र.५९५/१९६)

वरील वर्णनाच्या सदनिका मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७(सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची सदनिका मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १७/०८/२०२५.

सही/-
**ॲड. उषा जे.कांबळे**
कर्जत, "पुष्प विमल" निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री महेंद्र नारायण बडेकर यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे नागेवाडी, ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २१/६ एकुण ०.९०.०० पोटखराबा ००.१३.०० गुंठे, एकुण १.०३.०० जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १७/०८/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता.मु.पो कडाव ता.कर्जत रायगड
भ्रमणध्वनी : ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल **मिरॅकल व्हिजन हॉस्पीटॅलिटी सर्व्हीसेस एलएलपी** यांनी सदरहू मिळकतीचे मालकाकडून विकत घेण्याचे योजिले आहे. सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासणीकामी तसेच होणाऱ्या व्यवहारासंबधी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करत आहे.

**मौजे-वावे तर्फे हवेली, ता.सुधागड, जि.रायगड**

| अ. क्र. | गट क्र | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार | भोगवटदाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८ पै | ० | २-५१-३३<br>पो.ख.१-४२-६७<br>३-९४-०० | १-०० | |
| २ | २० | २ पै | ०-२२-६७<br>पो.ख.०-०५-३३<br>०-२८-०० | ०-०८ | |
| ३ | २० | ५पै | ०-६५-३३<br>पो.ख.०-३२-६७<br>०-९८-०० | ०-०५ | |
| ४ | २१पै | ० | २-३२-००<br>पो.ख.०-३४-००<br>२-६६-०० | १-३३ | |
| ५ | २२पै | ० | ३-६८-००<br>पो.ख.२-०४-००<br>५-७२-०० | १-३३ | श्री.सुरेश महादेव सावंत |
| ६ | २३ | १ पै | २-९४-००<br>पो.ख.१-८२-००<br>४-७६-०० | ०-९९ | सौ.माधुरी सुरेश सावंत |
| ७ | ३१ | ३ पै | १-९३-२०<br>पो.ख.१-२९-४७<br>३-२२-६७ | ०-६० | |
| ८ | ३६ | ५ पै | ०-१८-८०<br>पो.ख.०-०३-२०<br>०-२२-०० | ०-०९ | |
| ९ | ४५ | १० पै | ०-०४-००<br>पो.ख.०-०१-३३<br>०-०५-३३ | ०-०३ | |
| १० | १२ | ७ पै | ०-१२-००<br>पो.ख.०-००-००<br>०-१२-०० | | |
| ११ | १२ | ९ पै | ०-१२-००<br>पो.ख.०-००-००<br>०-१२-०० | | |
| | | एकूण क्षेत्र | २२-०८-०० | | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान मक्ता, वहिवाट, ताबा देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ॲड. अमोल पवार**
पत्ता : पहिला मजला, अवमेध व्हिला,
सेक्टर १२, प्लॉट १२, नवीन पनवेल (पूर्व)
जि.रायगड ४१०२०६ मो.क्र ९८३३७३७९२२


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सर्वप्रकारचे आजार, लठ्ठपणा, संतानप्राप्ती, व्यसनमुक्ती, विवाह/ सोनेतारण बिनव्याजी/लाखस दर महा ५०००/- घरबसल्या पिढ्यांपिढ्या लाखो कमविण्याची डॉ.नथुराम शिढू (नागोठणा-पोयनाड)रायगड ७५०७१६६०१५
- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- अलिबाग मधील रेस्टॉरंटसाठी वेटर, कुक, इ. पाहिजे आहेत. तसेच किचन मॅनेजरची आवश्यकता आहे. इच्छुकांनी खालील फोन क्रमांकावर संपर्क साधावा. मोबाईल क्रमांक -७७६७८५३९९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## बोधकथा
# प्रभूनाम अगाध शक्ती



एक भक्त एकदा एका साधूकडे गेले. त्यांनी साधून विचारले, मी कोणता जप करू? साधू त्यांना म्हणाले, राम कृष्ण गोविंद जप रोज सकाळी आंघोळ झाल्यानंतर वीस मिनिटे हा जप करायचा. साधूंचे म्हणणे त्या भक्ताने शांतपणे ऐकले. थोड्या वेळानंतर त्यांनी साधून विचारले, मी आणखीन काय करायचे?
साधुनी त्यांना सांगितले, हे नाम तू अखंडपणे म्हणत जा. आणखी काही करू नकोस. त्या भक्ताच्या मनात रुखरुख कायमची राहते.

### सद्गुरू स्वामी बोध

त्या भक्ताला असा संशय येतो की पूजा अर्चा सत्यनारायण, सप्तशती, गुरुचरित्र पारायण यज्ञयाग इत्यादी कर्म जर आपण केली नाहीत तर केवळ रामकृष्ण गोविंद म्हणून काय होणार? ही शंका त्या भक्ताच्या मनात असल्यामुळे सद्गुरूंनी दिलेले नाम हेच पराभूत होते. केवळ नाम जप काय हवं असेल ते करू शकेल. हे एक अत्यंत उत्कृष्ट असे साधन आहे. यासाठी दुसऱ्या कोणत्याही साधनांची जरुरी नाही. असा विश्वास नामधारकाला सुद्धा वाटत नाही तर इतरांची काय कथा? आपल्या साधने वर आपलाच विश्वास नसतो तेव्हा त्या साधनेचे अवमूल्यन होते. हरिनामावर आपली श्रद्धा नसेल तर ते नाम आपल्याला काय देणार? संत एकनाथ महाराजांनी म्हटलेले आहे आवडीने भावे हरिनाम घेसी तुझी चिंता त्याची सर्व आहे.

# कुंडलिका नदीच्या पुलावर जीवघेणे खड्डे

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

**मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड परिसरातील कुंडलिका नदीच्या पुलावर मोठे खड्डे पडले आहेत. या खड्डे पडल्यामुळे मार्गावरून प्रवास करणेही मुश्कील झाले असून विद्यार्थ्यांसहित वाहनचालक, नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.**



मुंबई-गोवा महामार्गांवरील कोलाड परिसरातील कुंडलिका नदीवरील पुलाचे काम चार ते पाच वर्षांपूर्वी पूर्ण झाले आहे. परंतु, पुलावर केलेले डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. पाऊस पडला की दरवर्षी या पुलावर तलावाचे स्वरूप प्राप्त होते. रस्त्यावरील पावसाचे पाणी खाली जाण्यासाठी लावलेले पाईप नियोजित ठिकाणापासून वर असल्याने पाण्याचा निचरा होत नाही. यामुळे पुलावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून यातून मार्ग काढताना वाहन चालकांची तारांबळ उडत आहे.

दुसरीकडे या खड्ड्यातून मार्ग काढताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या महामार्गालगत गोवे येथे गीता द. तटकरे कॉलेज असून शेकडो विद्यार्थी या मार्गावरून प्रवास करत असतात.

पावसाळ्यात कुंडलिका पुलावर साचलेले पाणी मोठ्या वाहनामुळे विद्यार्थ्यांच्या अंगावर उडते. दरम्यान काही दिवसांवर गणेशोत्सव असल्याने बाजरासाठी जाणाऱ्या नागरिकांना आपाला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. या खड्ड्यामुळे विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे त्यामुळे संबधित प्रशासनाने हे खड्डे तातडीने बुजवून गणपतीत चारकमन्यांचा प्रवास सुखकर करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शिक्षण प्रसारक मंडळात स्वातंत्र्यदिन उत्साहात

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने जनता विद्यालयाच्या प्रारंगणात संस्थेचे उपाध्यक्ष अबूबकर जळगांवकर यांच्या हस्ते ध्वाजारोहण करण्यात आला. याप्रसंगी दत्ता मसुरकर, दिलीप पोरवाल, दिनेश गुरव, राजू अभाणी, राजू ठक्कर, कैलास गायकवाड, विजय चुरी, नरेंद्र शहा, मनेष यादव, विनायक तेलवणे, ॲड .मुनिदास गायकवाड, जयंत पाठक, विनोद रजपूत, कानिफनाथ गोरे, प्राचार्य डॉ. दयानंद गायकवाड, प्राचार्य डॉ.गौरव तिवारी, जान्सी ऑगस्टीन, राजेंद्र म्हात्रे, समिक्षा ढोके यांच्यासह विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसचालन धर्मेंद्र म्हात्रे यांनी केले.

# नारंगीत विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून नारंगी येथील एच. पी. डेशीव्ह कंपनीच्या वतीने राजिप शाळा नारंगी येथील इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या पहिला क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. तसेच दत्तवाडी नारंगी व लहानवाडी येथील अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास अंजना मोटवाणी, भारती आरावकर, देवेंद्र देशमुख, लिली देशमुख, मीना देशमुख, निनाद गायकवाड, कुंदा जाधव, गुलाब वाघुले, मनाली म्हसे, दीपक खाडे, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभक्तीपर गीते सादर केली.



# रायगड मेडिकल असोसिएशनतर्फे आरोग्य शिबीर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड मेडिकल असोसिएशन आणि कन्झ्युमर प्रॉडक्ट्स डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन कर्जत नेरळ यांच्या संयुक्त विद्यमाने ७९ वा स्वातंत्र्यदिन निमित्त रक्तदान व आरोग्य तपासणी करण्यात आली.

कर्जत येथील शनी मंदिरात आयोजित शिबिराचे उद्घाटन रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी आणि राकेश परमार यांच्या हस्ते झाले. यावेळी २५० हून अधिक रुग्णांची तपासणी करम्यात आली. यावेळी सुरेश पिंपरे यांनी ७५ वे रक्तदान केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सचिव डॉ. प्रशांत गांगल, खजिनदार डॉ. कुमार ओसवाल, डॉ. दिलीप सावळे, डॉ. मनीष परमार, डॉ. रितेश जैन, डॉ. राहुल ओसवाल, डॉ. प्रेमचंद जैन, मुकेश कटारिया, नरेंद्र बोराडे, रवींद्र हिंगाड आणि विजय मांडे उपस्थित होते. रक्तदान शिबिराची सुरुवात सतीश पिंपरे यांनी रक्तदान केले आणि त्यांचे ७५ वे रक्तदान ठरले. शिबिराचे नियोजन सचिन ओसवाल, सुजित जैन, भावना परमार, रीना ओसवाल यांनी केले होते.

# नामफलकाचे अनावरण

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील बिरदोले गावाला देशाच्या स्वतंत्र लढ्याचा इतिहास आहे. या गावी स्वतंत्र्यदिनाच्या औचित्यावर स्वतंत्र्य लढ्यात कार्यरत असलेल्या आझाद दस्तामधील क्रांतिकारकांचे कार्य मोठे आहे. या आझाद दस्ताची आठवण रहावी म्हणून नामफलक अनावरण बिरदोले गावी करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाचे निमित्ताने बिरदोले गावी आझाद दस्ताची माहिती देणारे नामफलक राजिप शाळेत लावण्यात आला. या नामफलकाचे अनावरण स्वतंत्र्य सैनिकांच्या नातेवाईकांच्या हस्ते झाले. यावेळी नातेवाईकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नरेश कालेकर, विष्णु कालेकर, दिनेश कालेकर, सुदाम कालेकर, गुरुदेव जामघरे, भगवान जामघरे, रूपेश जामघरे, प्रदीप कालेकर, कुणाल कालेकर, यशवंत कालेकर, दुदा जामघरे, गजानन म्हात्रे आदी उपस्थित होते.

# प्रभात फेरीतून 'माझी वसुंधरा' संदेश

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**



रायगड जिल्हा परिषद शाळा, को. ए सो शाळा तसेच ग्रुप ग्रामपंचायत माजगाव येथे ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात करण्यात आला. याप्रसंगी ध्वजारोहण राजिप शाळा माजगाव शाळेचे मुख्याध्यापक रेखा जाधव, ग्रामपंचायतीत दिपाली पाटील, कोएसो शाळेत अपर्णा शिंदे यांच्या हस्ते करण्यांत आले.

यावर्षी ध्वजारोहनांचा मान महिला वर्गास मिळाला असल्यांचे उत्साही वातावरण पहावयांस मिळाला होता. यावेळी विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढत स्वच्छतेचा मंत्र नागरिकांना दिला. तसेच 'माझी वसुंधरा' संदेश देण्यात आला. यावेळी भारत माता की जय, जय जवान जय किसान, आपला परिसर स्वच्छ ठेवा, पाण्यांचा योग्य वापर करा, झाडे लावा झाडे जगवा असा संदेश विद्यार्थी प्रभात फेरीत दिला. यावेळी शाळेतील शिक्षक, नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पेण कोषागार कार्यालय जिल्ह्यात प्रथम

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री १०० व १५० दिवसीय कार्यालय सुधारणा किर्यक्रमात पेण कोषागार अधिकारी वैशाली शिर्के यांच्या कुशल कार्यप्रणाली व गुणवत्तापूर्ण कामगिरीने कार्यालयाचा जिल्ह्यात पहिला आणि विभागात दुसरा क्रमांक प्राप्त झाला. राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशाने १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम हाती घेण्यात आली होती. गुणवत्तापूर्ण कार्यासाठी पेण उपकोषागार कार्यालयाच्या कोषागार अधिकारी शिर्के व सहकाऱ्यांचा महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# साप्ताहिक राशिभविष्य १७ ते २३ ऑगस्ट २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### धन लाभ होण्याची शक्यता

**मेष :** राशीधारकांना या सप्ताहात आपणघरगुती प्रश्न आणि प्रलंबित घरगुती कामं पूर्ण करण्यासाठी लाभदायक कालावधी आहे. प्रेमाचा प्रवास मधुर पण क्षणकाल टिकणारा असेल. तुमच्या इतर कुटुंबियांमुळे तुमच्या वैवाहिक आयुष्यावर नकारात्मक परिणाम होईल, पण तुम्ही दोघेही ही परिस्थिती चांगल्या प्रकारे हाताळाल. तुम्ही ऑफिसच्या कामांना इतके लवकर पूर्ण कराल की, तुमचे सहकर्मी तुम्हाला पाहत राहतील. मित्रांचा आधार लाभेल आणि ते तुम्हाला आनंदी ठेवतील. तुमच्या नशिबाने या साप्ताहात तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे. तुमच्या जंगी पार्टीत सर्वांना सामावून घ्या. तुम्ही असा एखादा मोठा इव्हेंट आयोजित करू शकता. इतकी उर्जा तुमच्याकडे येणार आहे. अनावश्यक खर्च टाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल. **महिलांना**: विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. प्रकृतीबाबत जागरूक राहा, योगाचा अवलंब करा. **शुभ दिनांक** : १७,१८.

### आर्थिक समस्या दूर होतील

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमानपाहता तुम्ही मित्रांची साथसंगत गमावलीत तर तुमच्या हास्याला अर्थ नाही - तुमच्या हसण्याचा आवाज कुणी ऐकू शकणार नाही. जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. तुमचं तुमच्या जोडीदाराशी एखाद्या जुन्या कारणावरून भांडण होईल. पण साप्ताहाच्या शेवटी सगळं काही व्यवस्थित होईल. कुठून तरी उधार परत मिळू शकते ज्यामुळे तुमच्या काही आर्थिक समस्या दूर होतील. हमीपेक्षा आज तुमची ऊर्जा कमी आहे असे तुम्हाला जाणवेल, म्हणून अतिरिक्त कामाचा बोजा घेऊ नका. थोडी विश्रांती घ्या आणि भेटीगाठींच्या वेळा पुढे ढकला. चंद्राच्या स्थितीमुळे तुमचे धन व्यर्थ खर्च होऊ शकते. जर तुम्हाला धन संचय करायचे आहे तर, तुम्ही आपल्या जीवनसाथी किंवा माता-पिताच्या सोबत या बाबतीत बोलू शकतात. **महिलांना**: प्रकृतीबाबत, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. आरोग्याचा त्रास होऊ शकतो. वेळेवर जेवण घ्या, नातलगांकडून चांगली बातमी मिळेल. **शुभ दिनांक** : १९, २०.

### व्यवसायातील मतभेद टाळा

**मिथुन :** राशीसाठी आलेले पत्र संपूर्ण कुटुंबासाठी आनंददायी बातमी घेऊन येईल. तुमच्या जोडीदाराच्या कुटुंबातील सदस्यांच्या हस्तक्षेपामुळे तुमचा कालावधी अस्वस्थतेत जाईल. व्यस्त दिनचर्येचा व्यतिरिक्त तुम्ही आपल्यासाठी वेळ काढण्यात सक्षम व्हाल. रिकाम्या वेळात काही रचनात्मक कार्य करू शकतात. तुमचे वैवाहिक आयुष्य चुकीच्या पद्धतीने तुमचे शेजारी तुमचे कुटुंबिय आणि नातेवाईकांपर्यंत पोहोचवतील. घरात तुमच्या चांगल्या गुणांची चर्चा होऊ शकते. तुमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल. तुम्ही विना कुणाच्या मदतीने तुम्ही धन कमावण्यात यशस्वी व्हाल. तुमची अतिरिक्त ऊर्जा आणि प्रचंड उत्साह तुम्हाला सुयोग्य ठरतील असे निर्णय मिळतील आणि घरगुती तणाव सुकर करील. प्रेमामधील तुमच्या असभ्य वर्तणुकीची माफी मागा. तुम्ही आपल्या जीवनसाथीला सरप्राईझ देऊ शकतात. आपल्या सर्व कामांना सोडूनतुम्ही त्यांच्या सोबत वेळ घालवू शकतात. **महिलांना**: माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्न करा. **शुभ दिनांक**: २१,२२.

### अनावश्यक खर्च टाळा

**कर्क :** या सप्ताहात कर्क राशीधारकास तुमच्या वैवाहिक आयुष्यात अलीकडे फार मजा राहिलेली नाही; तुमच्या जोडीदाराशी बोला आणि काहीतरी कुल प्लॅन करा. तुम्हाला आपल्या जीवनात कुठल्या खास व्यक्तीची कमतरता वाटू शकते.अत्यंत व्यस्त वेळापत्रकात देखील आपले आरोग्य चांगले असेल. कुटुंबातील सदस्यांना आपल्या जीवनात विशेष स्थान असेल. आपल्या गोष्टींना स्पष्टपणे त्यांच्या समोर मांडा. तुम्ही सर्व नातेवाईकांपासून दूर होऊन आपल्या दिवसाला अशा जागेत घालवणे पसंत कराल जिथे जाऊन तुम्हाला शांती प्राप्त होऊ शकेल. वैवाहिक आयुष्यात एक छान डिनर आणि मस्त झोप मिळणार आहे. दररोजचा व्यायाम व योगाचा अवलंब करा निराशेचे सावट दूर करून आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करा. तडजोडीचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. आवश्यक कामाचा पाठपुरावा करणे महत्त्वाचे ठरू शकते. तुमचे वडील, ज्येष्ठ आज तुमच्यासाठी काही भेट आणू शकतात. **महिलांना**: प्रकृतीच्याबाबत चालढकलपणा करू नका. अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. नाही. **शुभ दिनांक** : १७,२३.

### नोकरदारांना दिलासा मिळेल

**सिंह** : राशीसाठी या सप्ताहात ग्रहमान पाहता विशेषतः नोकरदारांना मोठा दिलासा मिळू शकेल. आपला ताण उतरणार आहे, आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, पण अहंकारापासून दूर राहणेच योग्य ठरेल. आपली मते दुसऱ्यांवर लादू नका. आर्थिक बाजू चांगली ठेवता येईल, खिशात पैसा खेळेल, पण पर्यायाने खर्चाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. स्वतःमधील ऊर्जा पाहा व त्याप्रमाणे काम करणे ठीक राहील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाहीत याची दक्षता घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मित्रांची पारख करून त्यांची मैत्री ठेवा. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या ध्येयाजवळ जाऊ शकाल. व्यावसायिक क्षेत्रात मात्र तज्ञांच्या सल्ल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नये. हाती घेतलेल्या कार्यात यशाची अपेक्षा ठेवू शकता. **महिलांना**: बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न कराव. **शुभ दिनांक** : १९, २२.

### बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा वर्तमानकाळातील गोष्टींसाठी त्याचा योग्य विचार करून वागणे अधिक ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल, मात्र सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. सर्व बाबतीत प्रयत्नशील राहणे मात्र आवश्यक आहे. ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्या स्वीकारण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. त्यामुळे इतरांशी नाराजी आपण टाळू शकाल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, आपण आपल्या कार्यातील कामे कशी पार पाडता येतील याबाबत अधिक लक्ष द्याल व ती पार पाडण्याचा प्रयत्न कराल. वेळोवेळी ज्येष्ठांशी अथवा जाणकारांशी चर्चा करून प्रश्न सोडविता येतील. कामाचा उत्साह वाढीला लागेल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना** : अनावश्यक खर्च टाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल. आपल्या विकासाची एखादी योजना आखणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभ दिनांक** : १७,२३.

### कलागुणांना प्रोत्साहन मिळेल

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. प्रकृती जपा. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावा. आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळत जुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. **महिलांना** : महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. **शुभ दिनांक** : १८,२२

### संघर्षाचे प्रसंग टाळा

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहताया सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू नका. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळू शकेल. कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या. आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. **महिलाना**: कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी ऑफर मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. **शुभ दिनांक** : १९, २१.

### मुलांशी सामजंस्याने वागा

**धनु :** राशीसाठी या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण मुलांशी सामजंस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील.आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. घरून काम करताना जागरूक राहा. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. **महिलांना** : आपल्या कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल व सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा मिळवाल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, त्यामुळे गैरसमज वाढणार नाही. शेतीविषयक व स्थावरजंगमबाबतची कामे मार्गी लागतील. **शुभ दिनांक** : २०,२३.

### व्यवहारात सावधानता बाळगा

**मकर :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहताआपण थोरामोठ्यांच्या विचारांचे स्मरण करा. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावा. साहसीवृत्ती कटाक्षाने टाळा. नोकरादारांना दिलासा मिळेल. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. आपली बलस्थाने कोणती याचा मागोवा घ्या, म्हणजे त्यांचा भावी काळासाठी उपयोग करता येईल. या आठवड्यात आपली आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुनी वसूली होण्याची शक्यता. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कामकाजात घरुनच व्यस्त राहाल. आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घालण्याचा प्रयत्न करा. आर्थिक गुंतवणूक करताना तज्ञांचा सल्ला घेणे हितकारक ठरेल.आपल्या नावाचा विचार मान सन्मानसाठी होणार आहे, विध्यार्थीवर्गाला चांगली संधी मिळेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्या बद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. **महिलांना** : आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. सरकारी नियमांचे पालन करा. प्रकृतीस्वास्थ्य जपाउद्योग-व्यवसायात प्रगती कराल. मुलांकडे अधिक लक्ष द्या. **शुभ दिनांक** : १८, २०.

### प्रकृतीबाबत जागृत राहा

**कुंभ :** राशी या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक जागृत राहावे. विशेषतः कफ, उष्णतेचे विकार, खाण्यापिण्याचा हलगर्जी पणा करू नका जे जमते तेच करा. वाद-विवाद कटाक्षाने टाळा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. दररोजचा व्यायाम व योगाचा अवलंब करा निराशेचे सावट दूर करून आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करा. तडजोडीचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. आवश्यक कामाचा पाठपुरावा करणे महत्त्वाचे ठरू शकते. प्रयत्नाने बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल. प्रकृतीच्या बाबत अधिक जागरूक राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. कामाचा व्याप वाढणार आहे. मन स्थिर ठेवन्याचा प्रयत्न करा. आपल्या कामाकडे जास्त लक्ष दिल्यास तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी घडण्याची शक्यता आहे. विद्यार्थीवर्गाने आभ्यासा बाबत दुर्लक्ष करू नको. **महिलांना** : नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा, घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सामंजस्याने परिस्थिती हाताळा. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभ दिनांक** : १८,१९.

### स्वत:साठी वेळ काढा

**मीन** : राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता कुटुंबात वैद्यकीय खर्च निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर तुमच्या पैशा संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आडकलेली असेल तर या सप्ताहात त्यात तुम्हाला विजय मिळू शकतो आणि तुम्हाला धनलाभ ही होऊ शकतो. घरगुती प्रश्न आणि प्रलंबित घरगुती कामं पूर्ण करण्यासाठी लाभदायक कालावधी आहे. तुमच्या प्रियजनांचा दिवस उजळून टाका. कामामध्ये स्वतःसाठी वेळ काढणे खूप कठीण असते. परंतु, हा कालावधी असा आहे जिथे तुमच्या जवळ आपल्यासाठी भरपूर वेळ असेल. विवाहाचा परमोच्च आनंदाचा क्षण तुम्ही अनुभवू शकाल. मात्र काहीवेळा लोकांमध्ये असतानाही तुम्हाला एकटे वाटेल.तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. आठडव्याच्या शेवटी अनपेक्षितरित्या तुमच्या खर्चात वाढ झाल्याने तुमची मन:शांती ढळेल. **महिलांना** : कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रय़त्न करा. कलाक्षेत्राला एखादे बक्षीस आपल्याला मिळेल. **शुभदिनांक** : २०,२३.

# निवडणुकाचा बाजा कोणाचा? बोझा कोणाला?

**शिमगा झाल्यानंतर त्याचे कवित्व शिल्लक राहते तसेच निवडणूका झाल्यानंतर त्याबाबतचे दावेदार अनेक प्रकारे विषय मांडत असतात. देशभरात ठिकठिकाणी कोठे ना कोठे वर्षभरात निवडणूका चालूच असतात. या विधानसभा, लोकसभा, स्थानिक स्वराज्यसंस्था यांच्या निवडणूका निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पार पाडत असतात. राजकारण आणि निवडणूक या नाण्याच्या दोन बाजू समजल्या पाहिजेत. विचार करण्यासाठी गोष्ट आहे की छोट्या सहकारी संस्था, गृहनिर्माण संस्था अन्य काही धर्मादायसंस्था यांच्या निवडणूका असतील तरी सुद्धा राजकारण येतेच. राजकारण करणे, राजकारण असणे हा योगायोगाचा भाग नाही तर ते तेथे असणारच असे गृहीत धरणे महत्त्वाचे आहे. याचा अर्थ असा नाही की राजकारण म्हणजे गैरकृत्यासाठी सहभागी होणे परंतु प्राप्त परिस्थितीत काहीतरी असेच मांडले जात आहे. त्यासाठी भांडले जात आहे.**






निवडणूक मतदार यांद्यांचे घोळ, मतदानाचे घोळ, मतचोरी, निवडणूक बूथ ताब्यात घेणे इत्यादी काही विषय निवडणूका ऐनभरात येतात तेव्हा होतच असतात सत्ताधारी, विरोधक आणि निवडणूक आयोग यांच्यात कलगीतुरा रंगला आहे. याबाबत अनेक महिने, वर्ष वाद चालूच आहेत. निमित्त झाले आहे ते गेल्या आठवड्यात राहुल गांधी यांनी नागपूर येथील पत्रकार परिषदेत मतचोरीचा आरोप केल्याचा, हे आरोप भक्कम पुरावे देऊन राहुल गांधीनी केले आहेत. हे पुरावे मध्य बेंगळूर, लोकसभा मतदार संघातील महादेवपुरा या विधानसभा मतदार संघाच्या मतदार क्षेत्राच्या सखोल संशोधनात्मक विश्लेषणातून मांडले आहेत. २०२४ च्या लोकसभा जागा जिंकण्यासाठी एक लाख २५० बनावट मते पेरली होती. हे मतदार बनावट आहेत त्याची पेरणी करण्यासाठी निवडणूक आयोगाने मदत केली असल्याचा आरोप राहुल गांधीनी केल्यानंतर निवडणुकीचा निर्णय चुकीचा आहे हा सिद्धांत मांडायला सुरुवात केली आहे. पुराव्यानिशी निवडणूक आयोगावर केलेले आरोप निवडणूक आयोगाने फेटाळणे चुकीचे नाही पण पुराव्याच्या तथ्याच्या मांडणीनुसार निवडणूक आयोगाने चौकशी करणे क्रमप्राप्त आहे. लोकशाही प्रणालीने निवडणूक पार पाडणे आपल्या देशात आत्यंतिक गरजेचे आहे. राहुल गांधीनी दिलेले पुरावे बरोबर की चूक याची पडताळणी करणे गरजेचे आहे. कदाचित सशक्त लोकशाहीसाठी अशा प्रकारची प्रक्रिया निवडणूक आयोगाने राबविणे गरजेचे आहे.

लोकशाहीला नेमक्या धोका कोणाकडून आहे याची वेगवेगळी उत्तरे असतील. प्रत्येकाच्या चुली वेगळ्या असतील परंतु निवडणूकीत लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी राज्यकर्ते असतात. या लोकांनी निवडून दिलेले उमेदवार जर बनावट मतदारांच्या मदतीने संख्यात्मक दृष्टीने निवडून येत असतील तर लोकशाही प्रणालीची हत्या केल्यासारखीच असेल. निवडणूक प्रक्रिया एका वेगळ्या पावित्र्याच्या मर्यादित असणे गरजेचे आहे. प्रक्रिया राबविणारे निवडणूक आयोग आहे. या निवडणूक आयोगाची विश्वासहर्ता अबाधित राहणे म्हणजेच निवडणूकीचे पावित्र्य आणि लोकशाहीचा सन्मान राहण्यासारखे आहे. निवडणूक प्रक्रिया योग्यप्रकारे राबविण्याचा आग्रह धरणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. फक्त राजकीय पुढाऱ्यांचा तो मक्ता नाही. राजकारण करुन निवडणूक लढविणे ह ।



उमेदवारांचा पक्षाचा प्रश्न असेल ते यासाठी साम, दंड, भेद अशा सगळ्या गोष्टींचा वापर गैरवापर करत असतील सुद्धा! पण निवडणूक आयोगाने मतदार याद्या अद्यायवत करणे, एकच मतदार वेगवेगळ्या मतदार संघात नोंदवणे, मतदार याद्या पडताळणी न करणे या सगळ्या गोष्टींमुळे अनेक गोंधळ होऊ शकतात.

आपण आपला देश पुढारलेला देश असे म्हणतो, डिजिटेलायझेशन झाले आहे. म्हणतो पण प्रत्यक्षात निवडणूका संशयास्पद वाटाव्या अशा अनेक उदाहरणासहित स्पष्ट करता येऊ शकते. आपण डिजिटल कार्यप्रणालीच्या यशस्वी वाटचालीचे ढोल वाजवताना कमी पडत नाही पण आपल्या मतदारांच्या याद्या डिजिटल स्वरुपात उपलब्ध नाहीत. डिजिटल याद्या सहज छाननी करत्याजोग्या असतात. जर मतदार याद्या अद्ययावत डिजिटल स्वरुपात असतील तर मतचोरी मतदारांचे घोळ आणि घोटाळे होणारच नाही. निवडणूकीत जर यश येत नसेल तर त्याचा कार्यकारणभाव हा सोधला जाणारच आणि तसं झाले तर पारदर्शक चौकशी हाच उपाय ठरतो. प्रत्यक्षात मतचोरीचा आरोप झाल्यानंतर निवडणूक आयोगाने चौकशी करायची सोडून आरोप करणाऱ्यांना शपथपत्र मागणे निवडणूक आयोगाचा बालिशपणा स्पष्ट करण्यासारखा आहे.

राहुल गांधीच्या आरोपांत तथ्य नसेलही, पुरावे निराधार असतील सुद्धा. निवडणुकांमध्ये यश मिळत नसेल म्हणून सुद्धा वैफल्य देखील असेल. तरी सुद्धा निवडणूक आयोगांवर राहुल गांधीनी केलेले आरोप निस्पृह चौकशी करुन या घटनादल आयोगाने पारदर्शकता मांडायला पाहिजे. प्रत्यक्षात राहुल गांधीनी केलेल्या आरोपाचे खंडण मंडण सत्तारुढ भाजपा सरकार भाजपा नेते करतांना दिसत आहे. यामुळे हे काहीतरी गौडबंगाल आहे हे सर्वसामान्याच्या पण लक्षात येत आहे. निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा करणे मग ती विधानसभा असो वा लोकसभा असो या दरम्यान आचारसंहिता भंगाच्या तक्रार त्याची आयोगाने लावलेली विल्हेवाट या सगळ्या गोष्टी देशातल्या व राज्यातल्या जनतेला कळते आहे. निवडणूक आयोग पारदर्शक आहे का? निवडणूक आयोग सत्तारुढ भाजपाला साजेशी भूमिका घेतात का? भाजपाला मदत होईल असे निर्णय निवडणूक आयोग घेते का? असे अनेक प्रश्न आहेत याची खरीखुरी उत्तरे देशातल्या आणि राज्यातल्या जनतेला माहित आहेत. निवडणूक आयोगाची अपारदर्शकता लोकशाहीच्या पावित्र्याला धक्का पोहचवते याची जाणीव सुद्धा जनता जनार्दनाला आहे.

आपल्या राज्यात राहुल गांधीनी केलेल्या आरोपानंतर राष्ट्रवादीचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी राहुल गांधीनी मतचोरीच्या घोटाळा प्रकरणाची चौकशी करावी असे मत व्यक्त केले. निवडणुक आयोगाने प्रतिष्ठा जपावी असे आवाहन त्यांनी केले. हे आवाहन करताना त्यांनी विधानसभा निवडणुकावेळी दोन व्यक्ती माझ्याकडे आल्या आणि त्यांनी १६० जागा जिंकून देण्याची हमी दिली असे सांगितले पण निवडणूक आयोगाच्या विश्वासामुळे मी त्यांना नकार दिला असे सांगितले. शरद पवार राज्यातले ज्येष्ठ राजकारणी मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्र्यांची जबाबदारी आहे. त्यांनी आरोप जे केले आहेत किंवा दोन शब्द सुनावले आहेत ते निवडणूक आयोगाला आहेत. पण आपल्या राज्याचे तडफदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांची खिल्ली उडवत शरद पवार कपोलकल्पित बोलत आहेत असे भाष्य केले आहे.

निवडणूका या आजवर निवडणूका आयोगाने आखल्याप्रमाणे झाल्या आहेत. टी. एन.शेषण यांच्यासारख्या नीस्पृब निवडणूक आयोग कसे काम करतो याचे उदाहरण स्पष्ट केले आहे. राजकारणी धर्माच्या नावावर, जातीच्या नावांवर, भाषेच्या नावावर सुद्धा राजकारण करणार, वेळ आली तर समाजकारणाला सुद्धा वेठीस धरणार. राहुल गांधी किती पुरावे सिद्ध करतात, शरद पवारांनी कथित केलेली गोष्ट असेल, देवेंद्र फडणवीसांनी केलेली भाष्य असेल, भाजपाच्या प्रवक्त्यांनी निवडणूक आयोगाची मांडलेली बाजू असेल सत्ताधारी आणि विरोधकांचा जाहीर कलगीतुरा याबाबतीत असेल यामध्ये सर्वात महत्त्वाचे आहे ती निवडणूक आयोग! आयोगाची निस्पृहता!आयोगाची पारदर्शकता! कारण निवडणुकीत यश प्राप्त करणारा लोकनियुक्त उमेदवार असतो तो खऱ्या खुऱ्या मतदारांनी निवडून दिलेला असला पाहिजे, तो जर मतचोरांनी बनावट मतदारांनी निवडून दिला गेला तर लोकशाहीची पायमल्ली असेल खराखुरा मतदार हा मतदार राजा आहे. त्याचा निर्णय योग्य करण्यासाठी निवडणूक आयोगाने स्वतंत्र, निर्भिड, निस्पृह व्हायला हवे. तरच लोकशाहीचे वैभव अबाधित राहील. **

# वृक्षवल्ली आम्हा सोयरी



विठ्ठल पाटील

पृथ्वीच्या परिसंस्थेत सजीव आणि निर्जीव गोष्टी या निसर्गाचा भाग आहेत. या पृथ्वीवर आपण पशु, पक्षी, किटक व मनुष्य एकमेकांचे सहचर आहोत हे समजले की एकमेकांविषयी प्रेम निर्माण होवून दुरावा नाहीसा होईल. निसर्गा शिवाय जीवन नाही, हे ऋषीमुनी, संत महात्म्यांनी सजीवसृष्टीच्या निर्मितीपासून आजपर्यंत जगाला सांगितले आहे. असेच निसर्गाचे तत्वज्ञान सांगताना संत तुकाराम महाराज यांनी वृक्षांना आपले सोयरे मानले आहे. संत तुकाराम महाराजांचे अभंग हे संतसाहित्याचे अभिजात लेणं आहे.

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे।**
**पक्षी ही सुस्वरे आळविती।।**
**येणे सुखे रुचे एकांताचा वास।**
**नाही गुणदोष अंगा येत।।**
**आकाश मंडप पृथिवी आसन।**
**रमे तेथे मन क्रिडा करी।।**
**कंथा, कमंडलू देह उपचारा,**
**जाणवितो वारा अवसरु।।**
**हरिकथा भोजन परवडी विस्तार।**
**करोनि प्रकार सेवु रुची।।**
**तुका म्हणे होय मनासी संवादु।**
**आपलासी वाद आपणासी।।**

पर्यावरण संबंधी कोणता विषय आला की वरील अभंगाचे विश्लेषण दिले जाते. तुकाराम महाराज या सुप्रसिद्ध अभंगातून वृक्ष, वेली, यांची महती सांगताना निसर्गाविषयी कृतज्ञता व्यक्त करतात. वनातील वेली, वृक्ष, प्राणी, सुस्वर स्वराने देवाला आळविणारे पक्षी हे आमचे सगे सोयरे म्हणजे नातेवाईक झाले आहेत. असे सुख निसर्गरम्य वनांत आहे, हा वनांतील एकांतवास आवडतो. तिथे गुणदोष सांगणारे लोक नसल्याने गुणदोष लागत नाही. आकाश मंडपाप्रमाणे तर पृथ्वी बसण्याचे आसन असल्याने मन आनंदाची क्रीडा करते. देहासाठी गोधडी तर पाण्यासाठी कमंडलू तर वाहणारा वारा वेळेचे ज्ञान देतो. भोजनात हरिकथा त्या हरी कथांचे अत्यंत आवडीने सेवन करतो. महाराज म्हणतात एकांतामध्ये आम्ही आमच्या मनाशी संवाद आणि वादविवाद देखील मनाचा मनाशी होत असतो. निसर्गाचे महत्व व त्यातील प्रेरणा सहज सोप्या भाषेत महाराजांनी सांगितली आहे. या अभंगातून निसर्गातील एकांत हा माणसाला अंतर्मुख करण्यास भाग पडतो. पीक कणसात भरल्यावर पक्षी दाणे टिपण्यासाठी येतात. दाणे टिपताना पिकाला हानीकारक असलेले त्यावरील लहान किटक सुद्धा त्यांचे अन्न असते. गांडूळ जमीन भुसभुशीत करतो. तर उंदीर, घुशींचा उपद्रव सर्प थांबवतात. प्राण्यांकडून उत्सर्जित कार्बन डायॉक्साईड झाडे शोषून घेत आपल्याला प्राणवायू देतात. त्यामुळे निसर्गातील घटक हे मित्र आणि सगे सोयरेच आहेत. सध्याच्या परिस्थितीचा अंतर्मुख होऊन विचार केला तर आजपर्यंत मानवाने प्रगतीच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास घडवून आणला आहे. आज शुद्ध, स्वच्छ, ताजी हवा मिळणे अश्यक्यप्राय झाले आहे. सारी पृथ्वी व आकाश प्रदूषणाने व्यापून गेले आहे.

**सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ।।**

आज कृषी क्षेत्र खूप प्रगत झाले आहे. सिंचनाची साधने विपुल प्रमाणात आहेत. पाणी हे जीवन आहे व ते अमुल्य आहे. पाण्यावाचून सजीव जीवन अशक्य आहे. महाराज सांगतात की झाड वाढीसाठी त्याच्या मुळापर्यंत पाणी देणे आवश्यक आहे. एखाद्या कार्याचा मूळ उद्धेश आधार मजबूत करणे आवश्यक आहे. महाराज आपल्या अभंगातून जनतेला मोलाचा सल्ला देतात. आपण पाहतो की वृक्षरोपण झाल्यावर ते झाड जगले आहे की नाही हे आपण पाहत नाही. जी झाडे लावली आहेत ते जगवणे क्रमप्राप्त आहे.

**ओलें मूळ भेदी खडकाचें अंग ।**
**आभ्यासासी सांग कार्यसिद्धी ।।**

झाडांची मुळे खोलवर जाताना कठीण अशा खडकाला भेदून जातात. मुळे झाडाला अन्नघटक पुरवतात. जमिनीची धूप थांबवाने व पाणी धरून ठेवणे मुळे करत असतात. या रूपकातून मुळांचे महत्व विषद करताना अशक्यप्राय गोष्ट सततच्या प्रयत्नाने अभ्यासाने साध्य होऊ शकते.

**हरिनामवेली पावली विस्तार ।**
**फळीं पुष्पी भार वोल्हावली ।।**

झाडे, वेली विस्तारल्या की त्यावर फुले, फळे यांनी भरून जाते. त्यावर अनेक पक्षी येवून बसतात व आपली भूक भागवतात. मानव व पशु पक्षी यांच्या जगण्सायाठी सदाहरित वने असणे आवश्यक आहे. या रूपकातून हरी नामाची वेल विस्तारली असून पक्षीराज होऊन बसल्याने जीवन साध्य होईल. महाराज म्हणतात त्यासाठी उशीर नको

**भूतदया गाई पशूंचे पालन।**
**तान्हेल्या जीवन वनामाजी।।**

संत तुकाराम महाराज जीवनात गृहस्थाश्रमाचे नियम सांगताना म्हणतात. गाई म्हशी सारख्या प्राणिमात्राची काळजी घ्या, तहानलेल्यांना पाणी द्या, जंगलातील प्राण्यांनाही मदत करा. सजीवांबद्दल दयाभाव व काळजी करणाऱ्यांना आत्मज्ञान प्राप्त होते. पूर्वी जंगल व जंगलातील पाणवठे समृद्ध होते. त्यावेळी वन्यजीव मानवी वस्तीकडे शिकारीच्या मागे येत असत. आज जंगल, वने उजाड झाल्याने तुटलेली अन्नसाखळी शोधत वन्यजीव मानवीवस्ती मध्ये वास्तव्य करू लागले आहे. आज वनविभाग मार्फत वन्यजीव असणाऱ्या ठिकाणी कृत्रिम पाणवठे निर्माण करावे लागत आहे. हीच गोष्ट महाराजांनी साडे तीनशे वर्षांपूर्वी सांगितली.

**अवघीं भूतें साम्या आलीं ।**
**देखिलीं म्यां कैं होतीं ।।**
**विश्वास तो खरा मग।**
**पांडुरंगकृपेचा ।।**
**माझी कोणी न धरो शंका ।**
**ऐसे हो कां निर्द्वंद्व ।।**
**तुका म्हणे जें जें भेटे ।**
**तें तें वाटे मी ऐसें ।।**

अभंगातून महाराज सांगतात देवाचे सर्वत्र साम्य रूप आहे. सर्वत्र तूच आहे. मला माझ्या ज्ञानदृष्टीने केव्हा पाहता येईल. असे झाल्यास पांडुरंगाची कृपा झाल्याचा विश्वास होईल. माझे भय कोणाला वाटू नये, माझ्या विषयी शंका धरू नये. शत्रुत्व अथवा मित्रत्व सबंध असू नये असा भेद विहरीत कर. महाराज म्हणतात जे कोणी भेटतील ते सगळे माझे स्वरूप आहे असे मला वाटावे. किर्तनातून सांगितले जाते की महाराज दिनचर्या करत आळंदीला जाताना एका झाडावरच्या चिमण्या उडून जातात. त्यावेळी निष्पाप पक्षांना माझे भय आहे ते भयतत्व नष्ट व्हावे या अभंगातून पांडुरंगाची विनवणी करतात.

निश्चलपणे उभे असताना भूतात्मक भाव लाभल्याने चिमण्या पुन्हा झाडांवर बसतात. पुढे त्या महाराजांच्या अंगावरही बसतात. असा भाव आज कुणाच्या वाट्याला आलेला दिसत नाही. पुढे एकदा एका शेतकऱ्याच्या पिकाचे राखण करताना यात या पक्षांचा वाटा आहे म्हणत सारे पीक खाऊन जातात. शेतकरी दाद मागतो व चाळीस मन धान्याची भरपाई मागतो. धान्य मळणीला आल्यावर वारेमाप धान्याची रास लागते. चाळीस मनापेक्षा जास्तीचे धान्य देऊ केल्यावर ते महाराज प्रामाणिकपणे नाकारता. यातून अनेकांनी बोध घेत अनेक शेतकरी उभे पीक पक्षांसाठी ठेवतात. हीच तुकाराम महाराजांच्या अभंगाची सार्थकता आहे.**

# श्रमिक नाच मंडळाचे सुवर्ण पाऊल





प्रमोद जाधव

अलिबाग तालुक्यातील महाजने निसर्गाच्या सानिध्यात वसलेले गाव आहे. एकतेचे प्रतिक म्हणून या गावाकडे पाहिले जाते. गुण्यागोविंदाने या गावात सण, उत्सव साजरे केले जातात. कोकणातून उगम पावलेल्या बाल्या नृत्याची परंपरा आजही रायगड जिल्ह्यातील महाजने ग्रामस्थ मंडळाच्या वतीने जपण्याचा प्रयत्न केला आहे. श्रमातून निर्माण केलेल्या श्रमिक नाच मंडळाने सुवर्ण महोत्सवाकडे पाऊल टाकले आहे. विशिष्ट वयोगटातील मंडळी सहभागी असणाऱ्या बाल्या नृत्यामध्ये (जाखडी) तरुणाईदेखील सहभागी होत असल्याचे चित्र शनिवारी दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने दिसून आले.

कृष्णजन्माष्टमीनंतर गोपाळकाळानिमित्त बाल्या तथा जाखडी नृत्याचे सादरीकरण केले जाते. या दिवसापासूनच बाल्या नृत्याला सुरुवात होते. त्यानंतर गणेशोत्सवात बाल्या नृत्य ठिकठिकाणी घेतले जातात. कोकणच्या जाखडी नृत्याला एक वैशिष्टपूर्ण असा ठेका आहे. जाखडीला साथ देणारे, गण, गवळण गाणारे मध्यभागी एकत्र बसतात. वैशिष्टपूर्ण रंगीबेरंगी कपडे घालत जाखडी नृत्य करणारे त्यांच्या भोवती फेर धरून नाचतात. ढोलकीवर थाप पडताच नृत्याच्या पहिल्या कलावंताचा प्रवेश होतो. कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातून सुरु झालेला जाखडी नृत्य आपल्या गावातदेखील सुरु व्हावे, म्हणून महाजने गावांतील काही मंडळींनी पुढाकार घेतला. त्यावेळी श्रमदानातून ढोलकी व इतर साहित्य घेऊन श्रमिक नाच मंडळ सुरु केले. संगीत नाचाबरोबरच जाखडी नृत्याचा सराव सुरू केला. शिवकुमार पारंगे, राजाराम पारंगे, सूनील पारंगे, प्रभाकर पारंगे, यशवंत पारंगे, सहदेव पारंगे, जयवंत पारंगे, जयराम पाटील, रविंद्र पाटील, विलास भोनकर, हरिश्चंद्र पाटील, अनंत औचटकर, नारायण भोनकर यांच्यापासून बाल्या नृत्याची सुरुवात ५० वर्षापुर्वी झाली.



दरवर्षी गोपाळकाळानिमित्त बाल्या नृत्याला सुरुवात केली जाते. गण, गवळण घेत नृत्याचे सादरीकरण केले जाते.ही परंपरा आजही जपण्याचे काम मंडळाने केले आहे. हळूहळू या श्रमिक नाच मंडळामध्ये तरुण मंडळीदेखील सहभागी होऊ लागली.

विनोद भोनकर यांच्या ढोलकीच्या ठेक्यावर अनेकांचे पाय थिरकले जात आहेत. विनायक भोनकर यांनी बुवा म्हणूनदेखील भूमिका बजावली आहे. सध्या या श्रमिक नाच मंडळामध्ये सचिन पारंगे, जयदास पारंगे बुवा म्हणून आहेत. संजय पारंगेसह समिर पाटील, मनोज औचटकर, मनिष औचटकर यांचादेखील सहभाग असल्याचे चित्र दिसून आले आहे. श्रमिक नाच मंडळाने ५० वर्षाची परंपरा जपली आहे.

रायगड जिल्हयामध्ये कृष्ण जन्माष्टमीनंतर शनिवारी (दि. १६) गोपाळकाळा सण साजरा करण्यात आला. या निमित्ताने अलिबाग तालुक्यातील महाजने येथे श्रमिक नाच मंडळाच्या वतीने जाखडी नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी कोळयांचे पेहराव करण्यात आले. बेंजोमार्फत लावण्यात आलेल्या कोळी गीताच्या ठेक्यावर कलावतांनी नृत्याचे सादरीकरण केले. एक वेगळा उत्साह या निमित्ताने पहावयास मिळाला. महाजनाई देवीच्या मंदिराच्या प्रांगणात हा सोहळा पार पडला. **



# गणपतीचा पाट



मुंबई सारख्या शहरी भागात सार्वजनिक गणेशोत्सवातील 'पाटपूजन' कार्यक्रम पाहताना मनात गावाकडच्या पुर्व पारंपारिक चालत आलेल्या रुढी परंपरा रितीरिवाज जतन करणारा कोकणी असल्याचा आणि कोकणच्या संस्कृतीचा अभिमान वाटला. गणेशोत्सवातील प्रत्येक गोष्टीचं आम्ही पावित्र्य पाळतो. शहरी भागातील गणेश विसर्जनाचे दृश्य पाहून संताप येतो. मुर्ती आदराने विसर्जन करणारी कोकणी संस्कृती कुठे आणि बाजारबुणगी शहरी संस्कृती कुठे? कोकणी माणसं गणपती मुर्ती बनविण्याच्या पहिल्या दिवसापासून विसर्जनानंतरही त्या गणपतीच्या पाटावरुन परत आणलेल्या थोड्याशा मातीचेही पूजन करतात. ही संस्कृती, हा स्नेहभाव जपला पाहिजे.

"हयतो, गणपतीचो पाट वायच नमशीतल्या तळ्यातुन धुवून आण बघू!"

आबा आपल्या मुलीला सांगत होते.

"आबानु, नमशीतल्या तळ्यावरच कपडे धुवायला जाते, तिथेच मग त्याच पाण्यात पाट धुतला तरी चालेल ना?"

"नको... नको... असो ईचार सुद्धा करु नुको? देवाचो पाट आसा तो. त्याका कधीही कुठल्यापण पाण्यात धुवायचो नसता. नमशीतल्या तळ्यातील खळखळत्या खडकांमधून वाहणाऱ्या पाण्यात किती प्रकारचा पाणी मिसळलेला आसता, ह्या म्हायत हा काय तुका?"

आबा थोडेसे चिडलेच.

आणि खरंच, आमच्या कोकणात गणपतीच्या पाटाला जर नकळत पाय लागला, तरी अपराध झाल्यागत वाटतं. इतकी प्रगाढ श्रद्धा त्या पवित्रता गणपतीच्या पाटाशी जोडलेली असते. पाय लागला तर लगेच हात लावून नमस्कार केला जातो.

गणपतीचा पाट वर्षभर इतर कोणत्याही कामासाठी वापरला जात नाही. पाहुण्यांना बसायला देखील तो वापरला जात नाही. त्या पाटावर बसण्याचा मान फक्त गणपतीबाप्पाचा आणि नागपंचमीला नागोबाचा!

प्रत्येक कोकणातील घरात या पाटाला पूजनीय स्थान असते. केवळ श्रद्धेपुरतं नव्हे तर स्वच्छतेच्या दृष्टिकोनातूनही या परंपरेची मुळे खोलवर आहेत. पाट, माटी, समई, तांबे-पीतळेची भांडी, देवाचा नवा साज हे सगळं देवघरात सन्मानानं ठेवलं जातं.

गणपतीचा पाट गणपतीच्या शाळेत पेंटरकडे नेण्यासही विशिष्ट दिवस निश्चित असतो नारळी पौर्णिमा किंवा रक्षाबंधनाचा दिवस. कारण त्या वेळेस शेतकऱ्यांना शेतकामापासून विश्रांती मिळालेली असते, आणि देवाच्या पूजनाला वेळ देता येतो.

प्रत्येक गावाची परंपरा वेगळी असली, तरी श्रद्धेचा हा धागा सारखाच असतो घट्ट आणि शुद्ध.

आज मुंबईसारख्या शहरांमध्ये सार्वजनिक गणेशोत्सवांत मूर्तीचे जे विटंबन चाललेलं असतं, ते पाहून जीव तळमळतो. गणपतीच्या मूर्तीला केवळ शोभेची वस्तू समजणं, ही श्रद्धेची आणि संस्कृतीची घोर विटंबना आहे.

आमच्यासाठी गणपती म्हणजे घराचा एक जीवंत सदस्य! गणपती विसर्जनाच्या दिवशी लहानपणी डोळे भरून यायचे. विसर्जन करून माघारी आले की माटीखाली रिकामं झालेलं ते गणपतीचं आसन तो 'भकास' पाट बघवत नसे. ते रिकामेपण असह्य वाटायचं. जेवणाखाणाची इच्छाही उडायची.

कोकणात गणेशोत्सव हा केवळ सण नसतो ती आपल्या संस्कृतीची शुद्ध आणि आत्मिय अनुभूती असते.

गणपतीच्या आसनाबरोबर ठेवले जाणारे नारळ, सुपारी (शिपटा), कंवडाळ यांना देखील पूजनीय मानले जाते.

कंवडाळ म्हणजे 'इंद्रावण' फळ दिसायला भारी पण चवीनं अत्यंत कडवट!

हे सगळे फळ माटीच्या चारही कोपऱ्यांना पूजेसाठी बांधले जातात.

धनंजय शेटये

संत शेख महंमद यांनी आपल्या एका अभंगात इंद्रावण फळाचाही दाखला दिलेला आहे.

"आबा, ही 'पोवत्याची पौर्णिमा' कशाक साजरी करतात हो?"

मुलीचा प्रश्न ऐकून आबा हसले.

"ते सांगण्यासारखं बरंच आहे पण थोडक्यात सांगतो...

श्रीकृष्णाच्या बोटाला एकदा सुदर्शनचक्राने जखम झाली होती आणि द्रौपदीने आपल्या पदराचा कपडा फाडून त्या जखमी बोटाला बांधले होते. त्याबदल्यात श्रीकृष्णाने तिला जन्मभर रक्षण करण्याचं वचन दिलं. तेच हे 'भावबंधाचं नातं' पोवत्याची पूनव.

आता तुला प्रश्न पडलाय की गणपतीचा पाट याच दिवशी पेंटरकडे का नेऊन दिला जातो?

तर कोकणात पूर्वी बारा बलुतेदारांची परंपरा होती. प्रत्येकाचा व्यवसाय एकमेकांवर अवलंबून होता. गणपती मुर्ती बनवणाऱ्या पेंटरांकडे इतके पाट नसत, म्हणून प्रत्येक घरी पाट नेऊन देण्याची परंपरा पडली.

पोवत्याच्या पौर्णिमेच्या सुमारास शेतीच्या कामांपासून फावला वेळ मिळत असल्याने हाच दिवस पाट नेऊन देण्यासाठी ठरवला गेला.

अशी परंपरा प्रत्येक गावी थोडीफार बदललेली असते, पण पूर्वजांनी दिलेल्या परंपरेचा आदर राखणं, ही आपली जबाबदारी आहे."

"होय आबा, खरंच बरोबर सांगितलंत! मी पाट नीट धुऊन आणते आता..."

गणपती उत्सवाला कोकणात इतकं महत्त्व दिलं जातं, याचं मूळच ही श्रद्धा, आत्मियता, आणि विज्ञाननिष्ठ स्वच्छता यांचा संगम असतो.

परंपरेतून पावित्र्य जपण्याची सजीव भावना कोकणच्या गणेशभक्तीतून उमटते, आणि तीच खरी संस्कृतीची ओळख असते.

प्रत्येकाच्या मनात उत्साह असतो, पण त्याहीपेक्षा जास्त असते ती "गणपतीच्या पाटाची पवित्रता"!

गणपती बसवण्यासाठी जिथे मूर्ती ठेवली जाते तो लाकडी पाट असतो. कोकणात हे पाट बहुधा आंब्याचे, सागाचे किंवा उंबराचे लाकूड वापरून बनवलेले असते. अनेक घरांमध्ये तो पिढ्यानपिढ्या वापरला जाणारा वारसा असतो.

हा पाट वापरण्यापूर्वी तळ्यावर किंवा विहिरीवर नेऊन धुवून आणला जातो. त्याला गंध, फुलं, हळद-कुंकू लावून तो स्वस्तिकाने पूजला जातो. कारण हा पाट म्हणजे फक्त एक लाकडी चौकट नाही, तो गणपतीचे आसन आहे म्हणजे साक्षात परमेश्वराचं निवासस्थान.

पाट ठेवताना खाली सुपारीच्या पानांचं आसन, त्यावर भाताची वेदी, आणि मग त्यावर गणेशमूर्तीची स्थापना केली जाते. पाटाच्या चारही बाजूला पानांचे तोरण, नारळ, आंब्याची पाने ही नैसर्गिक शोभा दिली जाते ती केवळ सौंदर्यासाठी नाही तर ऊर्जेचा, शुद्धतेचा आणि सजीवतेचा भाग आहे.

गणपतीच्या दिवसांत पाटाजवळ बसताना किंवा पाटाजवळून जाताना सुद्धा लोक एकप्रकारचा गंभीरपणा, भक्तिभाव आणि संयम ठेवतात.

त्या भागात पाय ठेवले जात नाहीत लहान मुलांना सतत समज दिली जाते: "पाटाजवळ उड्या मारू नकोस!"

पाटावर काहीही टाकले जात नाही

तो पडू नये म्हणून काळजीपूर्वक हलवला जातो.

या सर्व नियमांमध्ये एक अनाम श्रद्धा दडलेली असते जेथे गणपती विराजमान होणार, तिथे घराचीही शुद्धता आणि भावनांची नितळता आवश्यक आहे.

कधीकधी तोच पाट आजोबांच्या काळातल्या गणपतीसाठी वापरला गेलेला असतो. त्यावरची वयोमानाची झळाळी दिसते काही जण त्या पाटाच्या कोपऱ्यावर तांबड्या रंगाचे ठिपके, काही वारसाहक्काचे चिन्ह म्हणून जपून ठेवतात. प्रत्येक खाच, प्रत्येक ओरखडा काहीतरी सांगून जातो काही आठवणी, काही बंध, काही प्रार्थना. गणपतीचे विसर्जन होताना तोच पाट डोळ्यांत पाणी आणतो. कारण त्यावरून बाप्पा उतरतात. त्याच पाटाला परत नीट धुवून, वाळवून, कपड्याने गुंडाळून, देवघरात ठेवले जाते जणू एखादा पूजनीय ग्रंथ गणपतीचा पाट म्हणजे फक्त मुर्ती ठेवण्याची जागा नव्हे, तो आपल्या मनातल्या श्रद्धेचा, नात्यांचा आणि शुद्धतेचा अधिष्ठान आहे. तो म्हणजे कोकणातल्या भक्तीची चिरंतन ओळख... एक पवित्र परंपरा. **

## वास्तवाचे विदारक दर्शन...

# तिची असाइनमेंट

तिची असाइनमेंट ही सर्वोत्तम सताळकर लिखित कादंबरी, पुण्याच्या उत्कर्ष प्रकाशनने देखण्यारूपात प्रकाशित केली आहे. 'मनोगत' मध्ये लेखकाने आपल्या कथा, लेख, कादंबरी या विविध साहित्यिक लेखनाविषयी आपली मते मांडली आहेत. कादंबरी लेखन हे लेखकासाठी आव्हान असते. ही कादंबरी लिहिल्यानंतर एक अवघड काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचे समाधान लेखकाला लाभले. या पुस्तकाचे सुंदर आणि अर्थपूर्ण मुखपृष्ठ चित्रकार श्रीराम बोकील यांनी तयार केले आहे. छोट्या-मोठ्या सोळा प्रकरणांतून ही कादंबरी वाचकांसमोर उलगडते.

राजस्थानमधील डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, देवेंद्रप्रसाद तथा डी. पी. ठाकूर यांच्या बंगल्यात, गोयल काकांच्या शिफारसीने अमेरिकेत जन्मलेली, भारतीय तरुणी बोस्टन विद्यापीठातील, आपले राजपूत राजांवरील संशोधन पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांसाठी, पाहुणी म्हणून येते. ठाकूर यांचा डॉक्टर झालेला आणि एमडी करीत असलेला प्रतीक हा तरुण मुलगा, मोनिका नागपालला विमानतळावरून आपल्या घरी आणतो. प्रथमदर्शनीच सुंदर मोनिका आणि उमदा प्रतीक एकमेकांवर फिदा होतात. अल्पावधीतच मोनिका घरातील सर्वांशी जुळवून घेऊन, त्या घरातीलच एक सदस्य होते. ठाकूरसाहेबांची आई, पत्नी, मुलगी यांच्याशी मोनिकाच्या प्रेमळ वागण्याने तिला सर्व आनंदाने स्वीकारतात. प्रतीक तिच्यावर अनुरक्त झाल्याचे, त्याच्या चाणक्ष आजीच्या लक्षात येते. मोनिका नागपाल तथा राजेश्वरी रंगनाथ ही एक ध्येयनिष्ठ पत्रकार आहे आणि ती त्यामधील एका विशिष्ट कामासाठी ठाकूर साहेबांकडे आपले नाव बदलून आलेली असते. गड, किल्ले येथे जाऊन संशोधन करण्याच्या निमित्ताने, राजेश्वरी आपल्या वरिष्ठ पत्रकार आणि पत्रकारितेतील गुरु अनिताशी संपर्कात राहते.

बिल्डर इंद्रनील राठी एका मोठ्या कमर्शियल प्रोजेक्टचे स्वप्न पाहत असतो. तेथे दीडशे घरे आणि छोटी, मोठी दुकाने होती. ती जागा इंद्रनील मूळ मालकाच्या, अमेरिकेत राहणाऱ्या वंशजाकडून विकत घेतो. इंद्रनीलचे मामा, अनिल भराडिया गृहमंत्री असल्याने, त्याला त्यांच्याकडून हे काम करून घ्यायचे असते. मात्र त्याला ते नकार देतात. पण जेव्हा इंद्रनील, त्यांच्या विरोधी नेत्याकडे जाण्याचे भय दाखवतो, तेव्हा गृहमंत्री नाईलाजाने त्याला सहकार्य करतात. विविध मार्गांनी ती वस्ती, तेथून उठवण्याचा इंद्रनील प्रयत्न करतो, तेथील काही लोक पैशाच्या लोभाने, तर काही बिल्डरच्या गुंडांच्या भीतीने ती वस्ती सोडून जातात. अंबिकानगरचे रहिवासी, साहेबसिंगच्या नेतृत्वाखाली, एकजुटीने इंद्रनीलला विरोध करतात. साहेबसिंग हा एका कारखान्यात फोरमनची नोकरी करणारा, मेहनती आणि स्वाभिमानी होता. तो प्रामाणिक आणि उत्तम नेतृत्व करतो. संघर्षाच्या अशा परिस्थितीत गुप्त बैठकीत, पोलिसांच्या मदतीने साहेबसिंगला, त्याच्या घरात, अमली पदार्थ सापडल्याचे दाखवून अटक केली जाते. तुरुंगातील हालअपेष्टांना तोंड देऊनही तो आपली भूमिका बदलत नाही. सहा महिन्यानंतर, गृहमंत्र्यांच्या आदेशानुसार, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या संगनमताने




साहेबसिंगचा एन्काऊंटर केला जातो. जंगलातून पोलिसांच्या गाडीतून जाताना, पोलिसांची बंदूक हिसकावून घेऊन पळून जाणारा साहेबसिंग पोलिसांना मारण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नाटक केले जाते. त्यासाठी साहेबसिंगला ठार केल्यावर, दोन पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना पोलीसच जखमी करतात. पत्रकार परिषदेत देवेंद्रप्रसाद ठाकूर ही बनावट हकीगत सांगतात. परिणामी समाज माध्यमांतून तीव्र टीका होते. राजकीय पाठबळामुळे आणि पोलिसांच्या क्रौर्यामुळे अंबिकानगरचे रहिवासी हतबल होतात. साहेबसिंगच्या कुटुंबाला न्याय मिळत

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

नाही. उलट त्याच्या कुटुंबीयांना अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. हे रहस्य उलगडण्याचे आव्हान, वाहिनीचे मालक दिवाकर घोष आणि तेथील मुख्य अधिकारी देवकुमार वर्मा आणि अन्य वरिष्ठांच्या बैठकीत अनिता ही ज्येष्ठ पत्रकार स्वीकारते. राजेश्वरी रंगनाथच्या सहाय्याने ही गुप्त कामगिरी पार पाडण्याचे ठरविले जाते. त्यासाठीची आवश्यक सामग्री राजेश्वरीकडे दिली जाते. राजेश्वरी ठाकूर कुटुंबातीलच एक भाग होऊन जाते आणि योग्य संधीची ती वाट पाहत राहते. काही दिवसांसाठी घरातील सर्व नातेवाईकांकडील लग्नासाठी बंगलोरला जातात. घरात मोनिका आणि ठाकूरसाहेब असतात. दिवसभरातील कार्यालयिन कामे संपल्यावर, ठाकूरसाहेब आरामात, श्रमपरिहारासाठी मद्यपान करतात. त्यावेळी मोनिका त्यांना गप्पांच्या ओघात बोलते करते आणि ते साहेबसिंग एन्काऊंटर प्रकरणाची, आपल्या सविस्तर बोलण्यातून, कबुली देतात. मोनिका हे सर्व गुप्त कॅमेरा आणि टेप रेकॉर्डरच्या सहाय्याने रेकॉर्ड करते. मिशन यशस्वी झाल्याने, घरात कोणालाही काहीच न सांगता मोनिका, ठाकूर यांचे घर सोडते. घरातील सर्व, ती अचानक निघून गेल्याने चर्चा करतात, पण कोणालाच तिच्या गुप्त कामगिरीची कल्पनाही येत नाही. मोनिका तथा राजेश्वरीच्या मनात गुप्त गोष्ट जाहीर करण्याविषयी द्वंद्व निर्माण होते. एका बाजूला तिला ठाकूर परिवाराचे प्रेम लाभले होते. प्रतीकही तिच्या प्रेमात होता. तिलाही तो मनापासून आवडत होता. दुसऱ्या बाजूला तिला पत्रकारितेचे आपले व्रत पाळायचे होते. अनिता मॅडम तिला साहेबसिंगच्या कुटुंबाकडे घेऊन जातात. त्याची पत्नी, पतीच्या खुनानंतर भांडी घासण्याचे काम करून कसेबसे आपले व मुलांचे पोट भरते आहे. विवाहित मोठ्या मुलीला सासर सोडून आईकडे निवाऱ्यासाठी यावे लागते. तिच्या हुशार भावाला शिक्षण सोडून द्यावे लागते. चोऱ्या करून तो पैसे मिळवू पाहतो. धाकट्या मुलीला वडिलांचा मृत्यू पाहिल्याने, त्या आठवणींनी वेडाचे वारंवार झटके येतात. हे सर्व पाहून राजेश्वरी आपला निर्णय पत्रकारितेच्या बाजूने देते.

"न्यूज इंडिया २४" या न्यूज चॅनेलवर हे सारे जाहीर होते आणि गृहमंत्री, वरिष्ठ पोलीस अधिकारी, ठाकूर यांचेसह सर्वांना तुरुंगात टाकले जाते. राज्यात सत्ताबदल होऊन नवीन मुख्यमंत्री पदभार स्वीकारतात. राजेश्वरीला त्यामुळे, त्यावर्षीचा, तिच्या ऐन तारुण्यात पत्रकारितेतील सर्वोच्च पुरस्कार प्राप्त होतो. तिला नोकरीत बढतीही मिळते. मात्र त्यासाठी तिला आपल्या प्रेमाचा बळी द्यावा लागतो.

ही कादंबरी आपल्या समाजातील वास्तवाचे विदारक दर्शन वाचकांना घडविते. स्वार्थी राजकारणी श्रीमंत बिल्डरच्या हितासाठी पोलीसदलाचा हवा तसा वापर करून, गरिबांचे कल्याण हिरावून घेऊन, त्यासाठी त्यांचाच बळी कसा घेतात, हे या कादंबरीतून स्पष्ट होते. शेवटी नवीन सत्ताधीश श्रीमंत बिल्डरला मात्र अटक न करण्याची काळजी घेतात, कारण त्यांना त्याच्याकडून निवडणुका जिंकण्यासाठी भक्कम निवडणूक निधी हवा असतो. या कादंबरीद्वारे सध्याचे भीषण वास्तव वाचकांसमोर मांडण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. कादंबरीतील विविध पात्रे दीर्घकाळ वाचकाच्या स्मरणात राहतील अशी आहेत. मात्र अनेक इंग्रजी शब्द खटकतात. काही किरकोळ मुद्रणदोषही राहून गेले आहेत. लेखक सर्वोत्तम सताळकर हे कर्नाटक राज्यात, गुलबर्गा येथे राहून, आपल्या विविध प्रकारच्या साहित्याद्वारे, मराठी साहित्य दालन समृद्ध करण्याचे कार्य उत्तम प्रकारे दीर्घकाळ करीत आहेत, ही गोष्ट उल्लेखनीय आणि प्रशंसनीय आहे. **

**पुस्तकाचे नाव : तिची असाइनमेंट**
**लेखक : सर्वोत्तम सताळकर**
**प्रकाशक : उत्कर्ष प्रकाशन, डेक्कन जिमखाना, पुणे ४. ९८२२८५६७५७.**
**प्रथमावृत्ती : ९.४.२०२४**
**पृष्ठे : १५५ मूल्य : रु.२००/-**

# बाप्पांच्या स्वागतासाठी बाजारपेठा सज्ज

**गणेशोत्सव हा आपला राज्य उत्सव म्हणून घोषित झाला आहे. तेव्हा यंदाचा हा उत्सव अधिक भव्य होण्यासाठी ही बाब कारक ठरणार असे म्हणता येईल. अर्थातच उत्सवात उत्साह असेल, तितका व्यवसाय अधिक होईल हे साधे सूत्र आहे. २७ ऑगस्टपासून दहा दिवसांच्या गणेशोत्सवाला सुरूवात होत आहे. गणरायाचे स्वागत करण्यासाठी भाविक सज्ज आहेत आणि त्यांच्या बरोबरीने बाजारपेठा सजत आहेत.**

आबालवृद्धांचे लाडके गणपतीबाप्पा अगदी काही दिवसांमध्ये घरोघरी विराजमान होतील. त्यामुळे सगळ्यांची लगबग बघायला मिळत आहे. दुसरीकडे रस्त्यांवर मांडव पडण्यास सुरूवात झाल्याने सार्वजनिक गणेशोत्सवाच्या तयारीनेही वेग घेतल्याचे चित्र आहे. काही बडी मंडळे सजावटीची यंदाची थीम जाहीर करुन बऱ्याच आधीपासून कामालाही लागले आहेत. तेव्हा एकंदरच या रंगतदार उत्सवासाठी प्रत्येकजण वेळ काढत असून बाप्पांच्या स्वागतासाठी सज्ज होताना दिसतोय. या रंगारंग वातावरणाचा आढावा तर घ्यायलाच हवा.

गणेशोत्सव हा आपला राज्य उत्सव म्हणून घोषित झाला आहे. यंदाचा हा उत्सव अधिक भव्य होण्यासाठी ही बाब कारक ठरणार असे म्हणता येईल. अर्थातच उत्सवात उत्साह असेल, तितका व्यवसाय अधिक होईल हे साधे सूत्र आहे. या वर्षी २७ ऑगस्टपासून दहा दिवसांच्या गणेशोत्सवाला सुरूवात होत आहे. गणेशोत्सवात श्रद्धा वाढते तितका व्यवसायही भरभराटीला येतो. सुंदर मूर्तीचे आकर्षण वाढत असताना हा व्यवसाय आता शेकडो कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. गेल्या वर्षी गणेशोत्सवादरम्यान मुर्तीचा व्यवसाय सुमारे ५५० कोटी रुपयांचा होता. तो यंदा ६०० कोटी रुपयांच्या पुढे जाण्याची अपेक्षा आहे. म्हणजेच या वर्षी गणेशमूर्ती घडवणाऱ्या व्यवसायात चांगली वाढ होण्याचा अंदाज आहे. गेल्या काही वर्षांमध्ये माती, पीओपी, ब्रश आणि रंगांच्या किमती वाढल्यामुळे मूर्तींच्या किमतीही वाढल्या आहेत. या वर्षीही मूर्ती मागच्या तुलनेत जवळपास दहा टक्के महाग आहेत.

नित्यनेमाप्रमाणे श्रींच्या मूर्तींचे बुकिंग आधीच सुरू झाले. मुंबई आणि आसपासच्या परिसरात एक फूट उंचीच्या गणेशमूर्तींची किंमत दोन ते तीन हजार रुपयांपर्यंत असते. गणेशोत्सवापूर्वी महाराष्ट्राच्या जवळजवळ प्रत्येक भागात मूर्ती बनवल्या जातात. परंतु राज्याच्या काही भागात मूर्ती बनवण्याचे कारखाने वर्षभर सुरू राहतात. रायगड जिल्ह्यातील पेण तालुका आणि त्याच्या आसपासचा परिसर गणपती मूर्तीनिर्मितीचे केंद्र मानले जाते. तिथे हमरापूर, कळवा, जोहा, तांबडशेत, दादर, रावे, सोनकर, उर्नोली, हनुमंत पाडा, वडखळ, बोरी, शिर्की येथे गणेशोत्सवाचे दहा दिवस आणि पितृपक्षाचे १५ दिवस वगळता वर्षभर प्रत्येक घरात सहा ते बारा फूट उंचीच्या मूर्ती बनवल्या जातात. या भागात अशी एकूण १,६०० युनिट्स असून त्यांची वार्षिक उलाढाल २५० ते ३०० कोटी रुपयांच्या घरात आहे. तेथे वर्षाला तीन ते ३.२५ कोटी मूर्ती घडवल्या जातात. यापैकी सुमारे सव्वा कोटी मूर्ती गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडूच्या घाऊक व्यापाऱ्यांकडे जातात आणि तेथून त्या देश-विदेशांमध्ये पाठवल्या जातात.

स्वाती पेशवे

एकंदरच गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या उत्सवामुळे या वर्षी राज्यात बारा हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त व्यापार होण्याची अपेक्षा आहे. 'ऑल इंडिया ट्रेडर्स कॉन्फेडरेशन'(कैट)च्या ते महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश, तमिळनाडू आणि गोवा या राज्यांमध्ये गणेशोत्सवादरम्यान आर्थिक घडामोडी वेगाने वाढतात. या राज्यांमध्ये सुमारे वीस लाख गणेश मंडळे आहेत. गेल्या वर्षी एकट्या महाराष्ट्रात सात लाखांहून अधिक मंडळे होती. त्यानंतर कर्नाटकमध्ये पाच लाख, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मध्य प्रदेशमध्ये दोन-दोन लाख आणि देशातील उर्वरित भागात दोन लाख मंडळे आहेत. प्रत्येक मंडळातील सजावटीवर होणारा सुमारे ५० हजार रुपयांचा खर्च विचारात घेतला तरी हा आकडा दहा हजार कोटी रुपयांच्या पुढे जातो. यामध्ये सेट, सजावट, साउंड सिस्टीम, मूर्ती आणि फुले इत्यादींचा समावेश आहे.



असे असताना सध्या गणेशोत्सवासाठी सर्वत्र, विशेषतः शहरी भागात जोरदार तयारी पहायाला मिळत आहे. स्वाभाविकच बाजारपेठांनी नवे उत्साही रूप धारण केलेले दिसत आहे. यंदाचा पाऊस समाधानकारक झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात आनंद आहे आणि त्याचा परिणाम फुलांच्या उत्पादनावरही झाला आहे. अर्थात गणेशोत्सव जवळ आला की फुलांची मागणी इतकी वाढते की भाविकांना खिसा बराच रिकामा करावा लागतो. दरवर्षीप्रमाणे यंदाही गुलाब, झेंडू, शेवंती, चाफा आदी फुलांचे भाव वाढलेले दिसत आहेत. सध्या गुलाबाचा दर एका जुडीला १५०-२०० रुपयांपर्यंत गेलेला दिसतोय. याचबरोबर सजावटीसाठी लागणाऱ्या वस्तूंमध्ये वापरल्या जाणाऱ्या झुंबर, रंगीत लाईट्स आणि मखर आदींचे दरही यंदा १५-२० टक्क्याने वाढले आहेत. मुख्य कारण म्हणजे कच्चा माल महाग झाला असून वाहतुकीचा खर्चही वाढता आहे. याचा एकत्रित परिणाम सर्व प्रकारच्या साहित्याच्या दरवाढीच्या रुपाने दिसतो आहे.

सणाच्या दिवसांमध्ये उंची कपड्यांची, दागदागिन्यांची खरेदी मोठ्या प्रमाणात होते. गणरायासाठीही मौल्यवान धातूची आभुषणे खरेदी केली जातात. लोक गणपतीला 'सोने अर्पण' करण्यासाठी दागिन्यांची खरेदी करतात. मात्र सोन्या-चांदीच्या दरांमध्येही यंदा मोठी वाढ झाली आहे. सध्या दहा ग्रॅम सोन्याचा दर लाखाच्या वर पोहोचल्याने तसेच चांदीदेखील चांगलीच तेजीत असल्यामुळे मध्यमवर्गीय ग्राहक या बाजारापासून दूर गेल्याचे दिसत आहेत. काही ग्राहक हलक्या वजनाचे पण आकर्षक डिझाईनचे दागिने पसंत करत आहेत. त्यामुळे सध्या अशा दागिन्यांना अधिक मागणी दिसत आहे. यंदा 'इको-फ्रेंडली' मूर्तींचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्यामुळे शाडू मातीच्या मूर्तींपासून कागदाच्या लगद्यापासून बनवलेल्या मूर्तींपर्यंत पर्यावरणपूरक पर्यायांची विविधता पाहायला मिळते आहे. 'सीड गणेश' या संकल्पनेत विसर्जनानंतर मूर्तीच्या मातीत मिसळलेल्या वृक्षबिया रुजतात आणि त्याचे रोप येते. नंतर योग्य ठिकाणी त्याचे रोपण करता येते. अशा मूर्तींची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढते आहे.

थीम डेकोरेशनमध्ये यंदा 'चंद्रयान-३', 'आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात निवास करुन आलेला पहिला भारतीय अंतराळवीर', 'अयोध्येचे श्रीराम मंदिर', 'जलसंवर्धन', 'ऑपरेशन सिंदूर' अशा विषयांवर आधारित सजावटीला भरपूर मागणी आहे तर घरगुती गणपतीसाठी 'मिनी मखर' किट्स, लाइट्स आणि पारंपरिक रांगोळीच्या नवीन नमुन्यांची खरेदी जोरात सुरू आहे. अनेकांना ऑनलाइन शॉपिंगची सवय लागल्यामुळे पूजा साहित्यही आता 'होम डिलिव्हरी'मध्ये मागवले जाते आहे. अगदी दुर्वा, बाप्पांसाठीचे खास फुलांचे हार, मोदक, हळदी-कुंकू, गंध यासारख्या गोष्टीही घरपोच मिळू लागल्या आहेत. त्याचबरोबर आरतीची पुस्तके, गणपतीची स्तोत्रे आणि सजावटीसाठी व्हिडीओ ट्युटोरियल्सचा ट्रेंडही वाढतो आहे. म्हणजेच, यंदा गणेशोत्सवाची तयारी परंपरेला धरून असली तरी तिला आधुनिकतेचा साजही लाभला आहे. गणेशोत्सव पाहण्यासाठी देश-विदेशातील लोक महाराष्ट्रात येतात. त्यामुळे पर्यटन आणि वाहतूक उद्योगालाही चांगले उत्पन्न मिळते. मोठ्या प्रमाणात आयोजित केल्या जाणाऱ्या सार्वजनिक कार्यक्रमांमुळे इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्या आणि त्या व्यवसायाशी संबंधित लोकांसाठी चांगला व्यवसाय निर्माण होतो. गणपती मंडप हे कंपन्यांसाठी प्रमोशन आणि लोकांशी थेट संवाद साधण्याचे साधन ठरते. म्हणूनच रिलायन्स, टाटा, अदानींसारखे कॉर्पोरेट गट मंडपांसाठी मोठ्या प्रमाणात देणगी देतात. स्थानिक नेतेदेखील यामध्ये मनापासून सहकार्य करतात. सध्या ही लगबगही वाढली आहे. मुंबई-पुण्याचा गणेशोत्सव जगप्रसिद्ध आहे. अनेक मंडपांमध्ये गणपतीच्या मूर्ती लाखो रुपयांच्या दागिन्यांनी सजवल्या जातात. अशा परिस्थितीत कोणत्याही अनुचित घटनेच्या भीतीपोटी गणपती मंडळे त्यांच्या मंडळांचा विमा काढतात. त्यामुळे विमा कंपन्यांना खूप व्यवसाय मिळतो. गेल्या वर्षी भारतातील सर्वात श्रीमंत गणपती मंडळांपैकी एक असणाऱ्याने आपल्या मंडपाचा ४००.५८ कोटी रुपयांचा विमा काढला होता. सुप्रसिद्ध 'लालबागचा राजा'नेही ३२.७६ कोटी रुपयांचा विमा काढला होता. विमा कंपन्यांना आशा आहे की, या वर्षीही मंडपांचा विमा एक हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकेल. या आशेने कंपन्यांनी मोठ्या मंडपांच्या आयोजकांना भेट देण्यास सुरुवात केली आहे. या विम्यामध्ये गणपतीच्या मूर्तीवर घातलेले दागिने, भाविकांची सुरक्षा आणि इतर जोखमी समाविष्ट असतात. एकंदर गरजेनुसार, बदलत्या काळानुसार गणेशोत्सवही बदलत आहे. सामाजिक सुधारणेच्या हेतूने सुरू केलेला हा सार्वजनिक उत्सव बदलाच्या एका नव्या वळणावर येऊन ठेपला आहे. त्याचा आनंद घेऊ या आणि सुरक्षित राहून, भान राखून गणेशाचे स्वागत करु या. **







● शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटना अलिबाग व प्रशांत नाईक मित्र मंडळातर्फे अलिबाग येथील शेतकरी भवन येथे शनिवारी (दि.१६) मानाच्या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. दहीहंडी उत्सवाचा मानबिंदू ठरणारे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली निटनेटके, उत्तम व्यवस्थापन व आयोजन करण्यात आले होते. शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्या हस्ते मानाच्या दहीहंडी सोहळ्याचे उद्‌घाटन करण्यात आले. (छायाचित्रः समीर मालोदे)






● चित्रलेखा नृपाल पाटील पुरस्कृत शेकाप पुरोगामी युवक संघटना पेझारी व मृदूंग म्हात्रे मित्रमंडळ आयोजित पेझारी येथे दहीहंडीचा उत्सव शनिवारी (दि.१६) साजरा करण्यात आला. प्रशांत नाईक मित्र मंडळाच्या अलिबाग कोळीवाडा गोविंदा पथकाने सात थरांची दहीहंडी फोडून मान मिळविला.

## हंडी फोडण्यासाठी गोविंदांचे कसब पणाला | कुर्डुस गावात ३३ वर्षांची परंपरा कायम

# विहिरीवरच्या दहीहंडीचा अनोखा थरार

**| रायगड | प्रतिनिधी |**

**दहीहंडीच्या दिवशी विविध गोविंदा पथकांद्वारे उंच-उंच मानवी मनोरे रचून हंडी फोडतानाची दृश्य आपणाला काही नवीन नाहीत. आपण सर्वत्र विविध थरांच्या दहीहंड्या पाहतो, बक्षिसे मिळवणासाठी जीव धोक्यात घालून ८-९ थर असे उंच मानवी मनोरे उभारणारी गोविंदा पथके पाहतो. पण त्याला अलिबाग तालुक्यातील कुर्डुस या गावी भरवली जाणारी दहिहंडी ही अपवाद आहे. या गावात मागील काही वर्षांपासून विहिरीच्या मध्यभागी वरील बाजूस दहीहंडी बांधण्याची अनोखी परंपरा आज देखील जपली जात आहे. या दहीहंडीचे आयोजन देऊळ आळी गोविंदा पथक कुर्डुस यांच्या मार्फत केले जाते.**

१९९१ साली कुर्डुस गावातील देऊळ आळी येथील पिंगळे, पाटील, शेरमकर, थळे आणि केणी परिवारातील शेतकरी तरुणांनी एकत्र येत, वेगळे काहीतरी करण्याच्या विचारातून विहिरीवरील दहीहंडीची संकल्पना उदयास आली. पहिली काही वर्षे या देऊळ आळीतील विहिरीवर तसेच बाजूला असलेल्या सीताफळाच्या झाडाचा आधार घेत दहीहंडी फोडण्याचे प्रयत्न झाले. परंतु, आता ही दहीहंडी विहिरीच्या मध्यभागी लावली जाते. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथके विहिरीच्या काठावर उभे राहून ऊंच उडी मारून दहीहंडीला स्पर्श करण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. जर दहीहंडीला गोविंदाच्या हाताचा स्पर्श झाला तर ती दहीहंडी फूटली असे समजून ती खाली उतरवून त्या विहिरीत फोडली जाते. त्यानंतर गोविंदा पथक त्या विहिरीमध्ये उड्या मारून आपला आनंद व्यक्त करतात. विहिरीवर गोल कठड्यावर बसून काहीजण गोविंदाला हाताच्या पंजात उचलून हंडीच्या दिशेने उडवतात. गोविंदानी उंच उडून दहीहंडीला हात लावून विहिरीत मध्यभागी पाण्यात पडायचं जरा अंदाज चुकला तर गोविंदा विहिरीच्या कठड्यावर पडू शकतो. म्हणूनच विहिरीच्या कठड्यावर इतर गोविंदा बसलेला असतात. हे करत असताना कोणतीही दुखापत अथवा इजा गोविंदा पथकातील कोणालाच होत नाही अथवा आजपर्यंत झालेली नाही. हे या विहिरीतील दहीहंडीचे वैशिष्ट्य आहे. त्या गावातील, मुंबईतील तसेच इतर जिल्ह्यातील लोकं देखील मोठ्या संख्येने या दहीहंडीचा थरार अनुभवण्यासाठी कुर्डूस गावाच्या विहिरीवर मोठी गर्दी करतात. पिंगळे बंधूं व गावकऱ्यांच्या सहकार्याने हि अनोखी दहीहंडीची परंपरा जगासमोर आली आहे.


(छायाचित्र : सुधीर नाझरे)



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)